


पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक ३१३ ■ शनिवार, दि.२३ मे २०२६ ■ मुल्य ५ रुपये ■ पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN /283 / 2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com

# अकोल्यातील पाध्ये कुटुंबाचा भारतीय लष्कराला 1 कोटींचा निधी !

## समाजशील शिक्षक मुकुंद पाध्ये सरांनी घालून दिला देशसेवेचा नवा आदर्श

प्रतिनिधी २३ मे

**अकोला:** सध्या संपूर्ण देशात आणि राज्यात 'नीट' परीक्षेच्या पेपरफुटीमुळे आणि गैरव्यवहारामुळे शिक्षण व्यवस्थेविषयी अत्यंत नकारात्मक भावना निर्माण झाली आहे. काही कृत्य करणाऱ्यांमुळे प्रामाणिकपणे ज्ञानदान करणाऱ्या संपूर्ण शिक्षक वर्गालाच जणू आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले गेले आहे. नकारात्मकतेच्या या घोर अंधारात संपूर्ण देशाला प्रेरणा देणारी आणि अकोलेकरांची छाती अभिमानाने फुगवणारी एक अत्यंत सकारात्मक बातमी अकोल्याच्या शिक्षण क्षेत्रातून समोर आली आहे!



अकोल्यातील शिक्षण क्षेत्रातील अग्रगण्य नाव असलेल्या 'पाध्ये एज्युकेशन'चे संचालक मुकुंद पाध्ये सरांनी भारतीय लष्कराच्या 'सेंट्रल वेल्फेअर फंडासाठी' तब्बल १ कोटी रुपयांची देणगी दिली आहे. शहीद जवानांच्या कुटुंबीयांच्या मदतीसाठी दिलेला हा निधी म्हणजे देशसेवा आणि सामाजिक बांधिलकीचा एक अभूतपूर्व आणि ऐतिहासिक आदर्श आहे. अकोला शहरात अत्यंत संघर्षमय परिस्थितीतून आपले शिक्षण पूर्ण करून मुकुंद पाध्ये सरांनी 'पाध्ये एज्युकेशन' या शिकवणी वर्गाची सुरुवात केली. प्रामाणिकपणा, सातत्य, सचोटी आणि सर्वोत्तम दर्जा या बळावर त्यांनी विदर्भासह देशभरातील हजारो विद्यार्थ्यांना घडवले. आज त्यांच्या मार्गदर्शनाखाली शिकलेले हजारो विद्यार्थी देश-विदेशात डॉक्टर आणि इंजिनिअर म्हणून कार्यरत आहेत. मात्र, केवळ विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञान न देता, स्वतःच्या प्रत्यक्ष कृतीतून देशप्रेम कसे जपावे, याचा धडाच पाध्ये सरांनी आपल्या विद्यार्थ्यांना आणि संपूर्ण समाजाला दिला आहे. विशेष म्हणजे मुकुंद पाध्ये सरांच्या मनात देशसेवेची ही ठिणगी आजची नाही. २६ वर्षांपूर्वी, म्हणजेच १९९९ मध्ये जेव्हा देश 'कारगिल युद्धा'चा सामना करत होता, तेव्हा पाध्ये सरांनी आपल्या क्लासच्या एका संपूर्ण बॅचची फी म्हणजेच १ लाख रुपये सैनिक कल्याणासाठी अर्पण केले होते. त्या काळात एका शिक्षकाने दाखवलेले हे धाडस आणि दातृत्व राज्यभर चर्चेचा विषय ठरले होते. आता तब्बल २६ वर्षांनंतर, त्याच प्रखर देशभावनेतून मुकुंद पाध्ये सरांनी थेट १ कोटी रुपयांचा निधी देशरक्षणासाठी बलिदान देणाऱ्या शहीद जवानांच्या कुटुंबीयांच्या कल्याणासाठी समर्पित केला आहे.

## 'त्या' हत्या प्रकरणातील आरोपी अन् मृतक यवतमाळचे!



मृतक -विकी भेंडे

प्रतिनिधी २३ मे

**अकोला :** बोरगाव मंजू पोलीस ठाण्याच्या हद्दीतील यावलखेड लोहमार्ग परिसरात एका अनोळखी युवकाचा मृतदेह संशयास्पद स्थितीत आढळून आल्याने परिसरात एकच खळबळ उडाली होती. यातील आरोपीला यवतमाळच्या अवधूतवाडी पोलिसांनी घटनेच्या रात्रीच अटक केली असून अकोला पोलिसांना माहिती दिल्यावरून शनिवारी सकाळी अकोला पोलिसांनी त्याला ताब्यात घेतल्याचे समजते. मृतकाचे नाव विकी उर्फ बबलू राजू भेंडे (१९)तर आरोपीचे नाव युवराज शंकर तांगडे (४२) दोघेही रा. गुरूनानक नगर, गोधनी रोड यवतमाळ असे आहे.

# पेट्रोल दरवाढीची हॅट्ट्रिक

## महागाईचा भडका : आठ दिवसात इंधनात तिसऱ्यांदा वाढ!

प्रतिनिधी २३ मे

**अकोला :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तमाम देशवासीयांना आगामी काळात इंधनाचा वापर जपून करण्याचे कळकळीचे आवाहन केल्यानंतर अनेकांना भविष्यातील आर्थिक अरिष्टाची चाहूल लागली होती. ही भीती आता खरी ठरताना दिसत असून पेट्रोल आणि डिझेलच्या दरात आता आठ दिवसात तिसऱ्यांदा वाढ करण्यात आली आहे. त्यामुळे आता अकोल्यात पेट्रोल १०९.०५ तर डीझेल ९५.६३ झाले आहे.

या दरवाढीचा थेट परिणाम जीवनावश्यक वस्तूंच्या किमती वाढण्यावर होत असून, महागाईचा भडका उडाला आहे. त्यामुळे सर्वसामान्यांचे जगणेच कठीण झाले आहे. सर्वप्रथम १५ मे रोजी पेट्रोलच्या दरात ३ रुपये आणि डिझेलच्या दरात ३.११ रुपयांची घसघशीत वाढ करण्यात आली होती. त्याला चार दिवस उलटत नाही तोच २० मे रोजी पेट्रोल आणि डिझेलच्या दरात दुसऱ्यांदा वाढ झाली आहे. त्यावेळी पेट्रोलच्या दरात ८६ पैसे आणि डिझेलच्या दरात ८३ पैशांची वाढ करण्यात आली होती. त्यानंतर शनिवारी सकाळपासून पेट्रोल आणि डिझेलच्या दरात तिसऱ्यांदा वाढ झाली. त्यानुसार पेट्रोलचा प्रतिलीटर दर ८७ पैसे आणि डिझेलची प्रतिलीटर किंमत ९१ पैशांनी वाढले आहेत. राज्यातील प्रत्येक शहरामध्ये पेट्रोल आणि डिझेलच्या दरात काही तफावत आहे.

# लग्नाचे आमिष दाखवून अत्याचार


## अकोल्यात पोलीस कर्मचाऱ्याला अटक

प्रतिनिधी २३ मे

**अकोला :** लग्नाचे आमिष दाखवून तरुणीवर वारंवार अत्याचार केल्याप्रकरणी एका पोलीस कर्मचाऱ्याविरुद्ध सिटी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संबंधित आरोपीला पोलिसांनी अटक केली असून, या घटनेमुळे पोलीस दलात खळबळ उडाली आहे. प्रकरणाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक संजय गवई करीत आहेत. पोलीसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, सचिन केशव गायकवाड (पोलीस कॉन्स्टेबल क्र. ६४८, चालक) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. तो अकोला येथील निमवाडी परिसरातील नवीन पोलीस वसाहतीतील बिल्डिंग क्रमांक १ (बी), क्वार्टर क्रमांक ५४ येथे वास्तव्यास आहे. त्याच्याविरुद्ध सिटी कोतवाली पोलीस ठाण्यात अप. क्र. २०८/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता (BNS) कलम ६९, ३५२ आणि ३५१ (२)(३) अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला आहे. फिर्यादी महिलेने दिलेल्या तक्रारीनुसार, आरोपी सचिन गायकवाड याने तिच्याशी विवाह करण्याचे आश्वासन दिले होते. या आमिषावर विश्वास ठेवून आरोपीने तिच्यासोबत वेळोवेळी शारीरिक संबंध प्रस्थापित केले. मात्र, नंतर लग्नास नकार देत आरोपीने फिर्यादीचा मानसिक छळ सुरू केला. तसेच, 'तू मला पुन्हा भेटायला आली तर तुला जिवे मारून टाकीन,' अशी धमकी आरोपीने दिल्याचा आरोपही फिर्यादीने केला आहे. या सर्व प्रकारामुळे त्रस्त झालेल्या पीडित महिलेने अखेर सिटी कोतवाली पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली. या तक्रारीची गंभीर दखल घेत पोलिसांनी २२ मे रोजी रात्री उशिरा गुन्हा दाखल केला. त्यानंतर तातडीने कारवाई करत आरोपीला अटक करण्यात आली. आरोपी पोलीस विभागात कार्यरत असल्याने या घटनेची शहरात मोठी चर्चा सुरू झाली आहे.

दरम्यान, या प्रकरणातील सर्व बाबींची सखोल चौकशी करण्यात येत असून, पीडितेचे जबाब आणि इतर पुराव्यांच्या आधारे पुढील तपास सुरू असल्याची माहिती पोलिसांकडून देण्यात आली.









सिटी न्यूज अकोला

शनिवार, दि.२३ मे २०२६

http://epaper.citynewssuperfast.com

## इंधन दरवाढीविरोधात सोमवारी वंचितचा बैलगाडी मोर्चा

**अकोला :** केंद्र सरकारच्या चुकीच्या धोरणांमुळे पेट्रोल, डिझेल, गॅस आणि जीवनावश्यक वस्तूंचे भाव गगनाला भिडले आहेत. जनतेला महागाईच्या खाईत लोटून स्वतः सत्ताधारी मात्र शेकडो गाड्यांच्या ताफ्यांसह पैशांची उधळपट्टी करत आहेत.

सरकारच्या या दुटप्पी भूमिकेचा निषेध करण्यासाठी वंचित बहुजन आघाडीच्या वतीने २५ मे रोजी सकाळी ९ वाजता शास्त्री स्टेडियम पक्ष कार्यालय ते जिल्हाधिकारी कार्यालय असा भव्य बैलगाडी मोर्चा काढण्यात येणार आहे. या मोर्चाच्या पूर्वतयारीसाठी जिल्ह्यातील सातही तालुक्यात व महानगरात बैठकी घेण्यात येत आहेत.

# लालुच पाचशे रुपयांची, होळी केली करोडो रुपयांची

## हिवरखेड चिचारी मार्गावरील शेतशिवारातील ही घटना



**हिवरखेड प्रतिनिधी :** फक्त पाचशे रुपयांच्या लालसेपोटी माणूस किती खालच्या स्तराला जाईल हे सांगणे कठीण आहे. पाचशे रुपयांच्या लालसेपोटी १८ एकर शेतीला आग लावून दिल्याची धक्कादायक घटना घडल्यामुळे सर्वत्र आश्चर्य व्यक्त केले जात आहे तर शेतकरी हवालदिल झाला आहे.

येथील प्रयोगशील शेतकरी मुकुंद पुरुषोत्तम अग्रवाल यांची व त्यांच्या कुटुंबीयांची हिवरखेड नजीकच्या चिचारी शेत शिवारात चंदनपुर गावालगत गट नंबर १९/ब, १९ क १९/ड मध्ये १८ एकर शेती असून त्या शेतात संत्रा सिताफळ बाग असून इतर सर्वच प्रकारची झाडे आहेत. शेताचे धु-यावर बांबुची झाडे लावलेली आहेत.

२१ मे रोजी दुपारी त्यांचे मित्र शेर खा नूर खा यांनी फोन करून सांगीतले की, 'तुमच्या चिचारी शेतातील बांबूला व पिकाना एका व्यक्तीने माचिसने आग लावली आहे. आणि मी त्याच्याकडे धावत गेलो असता तो मला पाहून नवी तलई कडे पळून गेला. असे सांगितले.

मुकुंद अग्रवाल यांनी लगेच शेतात जावून पाहिले असता तेथे मोठी आग लागलेली दिसली. त्या आगीमुळे शेतातील संत्रा, सिताफळाची शेकडो झाडे, शेताचे धुऱ्यावर असलेले अंदाजे ३५०० नग बांबु, जनावरांसाठी असलेला गोठा, गोठ्यात असलेली खताचे ३० पोते , शेतात पिंकाना पाणी देण्यासाठी लावलेले ड्रिप नळीचे ३० बंडल, स्पिंकलरचे ४५ पाईप, स्प्रिंकलरचे १८ पितळी नोजल, चंदनाची १० झाडे, सागवान १० झाडे, निलगिरिची ०३ झाडे, मिया जॉकी उच्च प्रजातीची आंब्याची ६० ते ७० झाडे, कुंपण आणि झटका मशीन असा अंदाजे दहा लक्ष रुपयाच्या वर मुद्देमाल जळून खाक झाला.

सामाजिक कार्यकर्ते सुरज चौबे यांनी तात्काळ घटनेची माहिती हिवरखेड पोलिसांना दिली असता हिवरखेड पोलिस घटनास्थळी दाखल झाले. व आरोपी रमेश मंगल कासदेकर रा. नवी तलई ता. तेल्हारा याला ताब्यात घेण्यात आले. त्याला पोलिसांनी विचारणा केली असता त्याने एका व्यक्तीने ५०० रुपये देऊन आग लावण्यास सांगितले असता मी ५०० रुपयांच्या लालसेपोटी शेताला आग लावली. आणि आग लावल्यानंतर त्या पैशाने दारू पिलो असा खुलासा केला. पैसे देणाऱ्या व्यक्तीचे नाव माहीत नसून मी त्याला चेहऱ्याने ओळखतो असे सुद्धा आरोपी रमेश कासदेकर याने सांगितले. मुकुंद अग्रवाल यांच्या फिर्यादीवरून हिवरखेड पोलिसांनी आरोपी रमेश कासदेकर यांच्यावर गुन्हा दाखल केला असून त्याला पैसे देऊन आग लावण्यास प्रवृत्त करणाऱ्याचा सुद्धा शोध घेतल्या जात आहे. ठाणेदार गजानन राठोड यांनी हे प्रकरण गांभीर्याने घेतले असून घटनेची माहिती मिळताच त्यांनी तात्काळ पोलीस ताफा पाठविला आणि विनोद खर्डे मेजर, हेड कॉन्स्टेबल आकाश गजभार इत्यादी नी आरोपीला तात्काळ अटक करून भारतीय न्याय संहिता कलम ३२६ फ नुसार गुन्हा दाखल केला. भीषण आग लागल्यानंतर पंकज अग्रवाल, शेर खान नूर खान, अब्दुल कलाम अब्दुल सलाम, रामधन अग्रवाल, सुरज चौबे, धिरज बजाज, गणेश पानेरकर, सुरेश मोरे, तसेच चिचारी आणि चंदनपुर येथील ग्रामस्थांनी आग विझविण्यासाठी धाव घेतली आणि मोठा अनर्थ टाळला तसेच प्रसंगावधान राखून तात्काळ जेसीबी बोलावून आगीच्या दोन्ही बाजू पलीकडील पालापाचोळा आणि इतर साहित्य बाजूला केल्याने आगीची झळ चंदनपुर आणि चिचारी गावापर्यंत पोहोचली नाही. कारण त्यांच्या शेताच्या दोन्ही बाजूला चिचारी व चंदनपुर अशी गावे आहेत आग वेळीच आटोक्यात आली नसती तर या दोन्ही गावांना आगीने झळ पोहोचली असती. आणि मोठा अनर्थ घडला असता.

### आग वेळीच विझवली नाही तर ...

चिचारी व चंदनपुर ह्या गावांना धोका होऊ शकतो हि बाब सामाजिक कार्यकर्ते धिरज बजाज यांनी महावितरणच्या अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिली. कार्यकारी अभियंता संजय कुटे अकोट, सहाय्यक अभियंता आशिष धांडे हिवरखेड, लाईनमन उमेश जावकार, ऑपरेटर सुदाम भगत, सागर काळे आणि महावितरणच्या संपूर्ण स्टाफ ने सहकार्य करीत दोन वेळेस विद्युत पुरवठा सुरू केल्याने आग विझविण्यात यश आले. मंडळ अधिकारी झापे व तलाठी गायकी यांना माहिती दिल्यानंतर आग लागल्याच्या दुसऱ्या दिवशी कृषी विभाग व महसूल विभागाने संयुक्त पंचनामा करून शेतकऱ्याला तातडीने मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न करू असे सांगितले. यावेळी तलाठी किशोर गायकी, कृषी विभागाचे पेठे इत्यादींनी भेट दिली.

## पातूर नगरपरिषद निवडणूक : सदस्य पदाकरिता सात उमेदवारांचे अर्ज दाखल

### सोमवारी अर्ज दाखल करण्यासाठी मोठी गर्दी होण्याची शक्यता

प्रतिनिधी २३ मे

**पातूर :** पातूर नगरपरिषदेची बहुप्रतिक्षित निवडणूक येत्या २० जून रोजी होऊ घातली असून निवडणुकीची राजकीय रणधुमाळी आता वेग घेताना दिसत आहे. दिनांक १८ मे पासून सदस्य व नगराध्यक्ष पदासाठी नामनिर्देशन पत्र दाखल करण्यास सुरुवात झाली असून शुक्रवार दिनांक २२ मे रोजी सदस्य पदासाठी सात उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. त्यामुळे शहरातील राजकीय वातावरण तापू लागले असून विविध पक्ष व इच्छुक उमेदवारांच्या हालचालींना वेग आला आहे.



आज दाखल झालेल्या अर्जांमध्ये प्रभाग क्रमांक २ सर्वसाधारण जागेसाठी आनंद रामभाऊ तायडे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. तसेच प्रभाग क्रमांक २-ब सर्वसाधारण महिला जागेसाठी अलका सुरेंद्र उगले यांनी अर्ज सादर केला आहे.

प्रभाग क्रमांक ३ मध्ये देखील मोठी हालचाल पाहायला मिळाली. नामनिर्देशन प्रक्रियेत प्रभाग ३ मधून कैलास मोतीराम उगले, अजय गजानन पाटील आणि राजू लक्ष्मण उगले यांनी उमेदवारी अर्ज दाखल केले. तर प्रभाग ३-ब सर्वसाधारण महिला जागेसाठी पुनम सचिन सिंह बायस यांनी अर्ज भरला असून प्रभाग ३-व सर्वसाधारण महिला जागेसाठी निशा संजय निखाडे यांनी आपले नामनिर्देशन पत्र दाखल केले आहे.

नगरपरिषद निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची अंतिम तारीख २५ मे आहे. मात्र शनिवार व रविवार सुट्टीचे दिवस असल्यामुळे प्रत्यक्षात सोमवार हा अर्ज दाखल करण्याचा शेवटचा महत्त्वाचा दिवस ठरणार आहे. त्यामुळे सोमवारी नगरपरिषद कार्यालयात इच्छुक उमेदवार, पक्ष पदाधिकारी व समर्थकांची मोठी गर्दी होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, पातूर शहरात विविध राजकीय पक्षांकडून उमेदवार निश्चिती, आघाड्या, बंडखोरी आणि प्रचाराची प्राथमिक तयारी सुरू झाली असून आगामी काही दिवसांत निवडणुकीचे वातावरण आणखी रंगण्याची चिन्हे दिसत आहेत.

### हिवरखेडच्या लाडक्या बहिणी उन्हात निघाल्या अकोल्याला

**हिवरखेड :** काऊन आले नसणार बाई माये पैसे असा विचार करून येथील अनेक महिला कडकडत्या उन्हा मध्ये अकोला महिला बाल विकास कल्याण कार्यालयात जात आहेत. तेथे गेल्यावरही लांबलचक लाईन मध्ये उभे रहावं लागत आहे. राज्यसरकारने या योजनेचा लाभ सर्व महिलांना दिला पाहिजे परंतु सध्या या योजनेमुळे महिलां मध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. आता पर्यंत खात्यात पैसे जमा होत होते परंतु आता काय गडबड झाली.

कळायला मार्ग नाही. शहरातील तसेच जिल्ह्याच्या ग्रामीण भागातील महिला कासावीस होत आहेत.

## सातपुड्याच्या पायथ्याशी बिबट्याची दोन मित्रांशी झुंज, बोरव्हा नाल्यात बिबट्याचा हल्ला



आम्ही जखमींवर उपचार करून सुखरूप त्यांच्या निवासस्थानी सोडून पुढील मदत मिळवण्यासाठी अर्जाची पूर्तता करू, तसेच बिबट्याला जेरबंद करण्यासाठी आणखी ग्रस्त वाढू,

**जी.पी. हटवार,** आरएफ ओ अकोट

---------------------

मी व माझा मित्र हिंगणी वरून हिवरखेड बोरव्हा या मार्गे, कुटार, पाहण्यासाठी जात होतो, अचानक येथील नाल्यात बिबट्या आमच्या समोर आला आणि हल्ला चढविला,

**गजानन सोनोने,** जखमी युवक (हिंगणी)

**हिवरखेड :** नजीकच्या सातपुड्याच्या पायथ्याशी आदिवासी भागातील बोरव्हा गावाच्या नाल्यात २२ मे च्या दुपारी हिवरखेड वरून बोरव्हा जाणाऱ्या दोन तरुण मित्रांवर बिबट्याने अचानक हल्ला चढविला. या दोन मित्रांनी सुद्धा जीव वाचविण्यासाठी बिबट्याला, झुंज दिली. या घटनेत गजानन सोनोने रा. हिंगणी अंदाजे (३८) या तरुणाच्या उजव्या मांडीला बिबट्याने जबर चावा घेतला व पाठीला पंजा मारला.

तर दुसरा मित्र रमेश सोळंके याने आपल्या मित्राला वाचविण्यासाठी बिबट्यावर काठीने हल्ला चढविला या दरम्यान बिबट्याने पड काढला जखमी मित्राला तात्काळ हिवरखेड प्राथमिक आरोग्यवर्धनीं केंद्रात उपचार देण्यात आला असून पुढील उपचारा करिता अकोला रवाना करण्यात आले,तर या हल्ल्यातील जखमी युवकाची वनविभागाने पाहणी केली असून वनविभागा कडून नुकसान भरपाई देण्यात येईल अशी माहिती वनविभागा कडून प्राप्त झाली.

## सुंदर साड्यांचा अमृतवाडीमध्ये महासेल २० ते २६ मे दरम्यान महिलांना सुवर्णसंधी



**अकोला :** शहरातील अमृतवाडी मध्ये बुधवार, २० मे पासून २६ मे पर्यंत एकाच छताखाली सुंदर सुंदर साडयाचा मोठा खजिना आहे. ज्यामध्ये बनारसी , जॉर्जेट, शिफॉन, वायल, गार्डन वरेली, पैठणी, इरकली, नारायण पेठी, कांजीवरम, बनारसी, पोचमपल्ली, संबलपुरा, चंदेरी, पटोला, कोसा, प्युअर सिल्क, कॉटन सिल्क, पार्टीवेअर कलेक्शन, वेडिंग कलेक्शन एकापेक्षा एक सुंदर साड्यांचे कलेक्शन असेल. काय सुंदर साडी आहे ग.., पदरावरची नक्षी तर बाई किती सुरेख...कुठून घेतलीस ?,,,, असे जर तुम्हाला एखाद्या समारंभात कुणी विचारले तर तुमचा उर अभिमानाने भरून येईल. त्याला कारणही तसेच कारण साडी म्हणजे मायेची अलगद मिठी. अशा सुंदर साड्यांसाठी एकदा भेट द्या शहरातील अमृतवाडी येथील यावर्षीच्या सर्वात मोठ्या सेलला या सेलमध्ये पंधराशे ते दोन हजार रुपये पर्यंतच्या किमती साड्या मिळतील केवळ दोनशे, अडीचशे ते तीनशे रुपया पर्यंत. एकाच छताखाली सुंदर सुंदर साडयाचा मोठा खजिना ज्यामध्ये बनारसी , जॉर्जेट, शिफॉन, वायल, गार्डन वरेली, पैठणी, इरकली, नारायण पेठी, कांजीवरम, बनारसी, पोचमपल्ली, संबलपुरा, चंदेरी, पटोला, कोसा, प्युअर सिल्क, कॉटन सिल्क, पार्टीवेअर कलेक्शन, वेडिंग कलेक्शन एकापेक्षा एक सुंदर साड्यांचे कलेक्शन तर मग वाट कसली पाहता? हा सेल केवळ २० मे ते २६ मे पर्यंतच उपलब्ध. ही संधी दवडू नका असे आवाहन करण्यात आले आहे.

## शिर्ला ग्रामपंचायतीत एलईडी लाईट, ब्लिचिंग पावडर व कचराकुंडी खरेदीत मोठा भ्रष्टाचार ?

### ग्रामस्थ संतप्त; सखोल चौकशीची मागणी जोरात

**पातूर :** तालुक्यातील अ दर्जाची शिर्ला ग्रामपंचायत सध्या कथित भ्रष्टाचाराच्या आरोपांमुळे चांगलीच चर्चेत आली आहे. शासनाकडून विविध विकासकामांसाठी लाखो रुपयांचा निधी मिळत असताना नागरिकांच्या मूलभूत सुविधांकडे दुर्लक्ष करून सत्ताधारी पदाधिकारी व काही कर्मचारी यांनी संगनमताने कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार केल्याचा गंभीर आरोप ग्रामस्थांनी केला आहे. त्यामुळे संपूर्ण परिसरात संतापाची लाट उसळली आहे.



माहितीनुसार, सन २०२३ ते २०२६ या कालावधीत ग्रामपंचायतीने एलईडी लाईट खरेदी व बसविण्याच्या नावाखाली तब्बल ६ लाख ७५ हजार ७९० रुपये खर्च दाखवला आहे. विशेष म्हणजे पातूर शहरातील विविध हार्डवेअर व शॉपिंग सेंटरमधून साहित्य खरेदी केल्याचे दाखवण्यात आले असून लाईट बसविण्यासाठी लाखोंची मजुरीही काढण्यात आली आहे. मात्र ज्या भागात आधीपासूनच विद्युत पोल व व्यवस्था अस्तित्वात आहे, त्या ठिकाणी एवढा खर्च नेमका कशासाठी करण्यात आला, असा सवाल ग्रामस्थ उपस्थित करीत आहेत. याहून धक्कादायक बाब म्हणजे शिर्ला ग्राम पंचायतीकडे स्वतःची कोणतीही पाणीपुरवठा योजना नाही. गावाला पाणीपुरवठा हा पातूर नगर परिषद हद्दीतून केला जातो. तसेच ग्रामपंचायत हद्दीत सार्वजनिक विहिरीही नसताना २०२३ ते २०२५ दरम्यान ब्लिचिंग पावडर खरेदीसाठी तब्बल ९९ हजार रुपये खर्च दाखवण्यात आला आहे. पाणीपुरवठा योजना नाही, सार्वजनिक विहिरी नाहीत, मग एवढ्या प्रमाणात ब्लिचिंग पावडर नेमकी कुठे वापरण्यात आली? असा संतप्त सवाल नागरिक विचारत आहेत. तसेच ओला व सुका कचरा व्यवस्थापनासाठी २०२३ मध्ये तब्बल १ लाख ७२ हजार रुपयांच्या कचराकुंड्या खरेदी करण्यात आल्याचे दाखवण्यात आले आहे. मात्र या कचराकुंड्या नेमक्या कोणत्या नागरिकांना देण्यात आल्या? त्या प्रत्यक्षात अस्तित्वात आहेत का? याबाबत ग्रामस्थांमध्ये मोठी शंका निर्माण झाली आहे.

दरम्यान, ग्रामपंचायतीतील या कथित आर्थिक गैरव्यवहारामुळे ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी असून संबंधित प्रकरणाची उच्चस्तरीय व निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे.

### मध्यवर्ती बसस्थानकात विविध समस्या

**अकोला :** येथील नवीन बसस्थानक आगार क्रमांक दोनमध्ये अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. बसस्थानक परिसरात सर्वत्र घाणीचे साम्राज्य पसरलेले आहे. जिकडे तिकडे कचरा दिसत असून, तो हवेने उडून आत येत आहे. यामध्येच प्रवाशांना बसावे लागत आहे. तसेच थंड पाण्याची मशीन सुद्धा बंद असल्यामुळे प्रवाशांना भरउन्हात पिण्याच्या पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे. बसस्थानकात उन्हाळ्याचे दिवस लक्षात घेता वाहनचालकांसाठी विश्रामगृहात नवीन कुलर लावलेले होते. त्या दोन्ही कुलरची मोटर बंद पडलेली असून भरउन्हात त्यांना उकाडा सहन करावा लागत आहे.

## लिनेस क्लब तर्फे मदर्स डे निमित्त महिलांचा सत्कार

प्रतिनिधी २३ मे

**अकोला :** खडकी येथील 'मातोश्री वृद्धाश्रमात' लिनेस क्लबच्या सखींनी भेट दिली. तेथील सर्व मातांची आरती ओवाळून त्यांचे स्वागत केले. व त्यांचे तोंड गोड केले. तसेच त्यांना गरजेच्या वस्तू प्रदान केल्या.



गरजेच्या वस्तूंमध्ये बिस्किटांची पाकिटे व नमकीन भारती खंडेलवाल तर्फे, प्रोटिन टॉनिक उमा बाजोरिया तर्फे, नॅपकिन आशा मोटवानी तर्फे, चहा पिण्यासाठी मातीचे कुल्हड भारती खंडेलवाल तर्फे, उन्हाळ्या पासून दिलासा मिळण्यासाठी ताकाचे पाऊच सुनंदा जी गुप्ता तर्फे, नॉन-वोवन पिशव्या इंदुमतीजी मोहता तर्फे, मिष्टान्न सुलेखाजी गुप्ता तर्फे, वृद्धाश्रमातील वृद्ध पुरुषांना देखील त्यांच्या खोलीत जाऊन प्रोटिन टॉनिक, ताक, बिस्किट आणि नमकीनच्या पाकिटांचे वाटप करण्यात आले.

मां से बेटी सवाई प्रोजेक्ट अंतर्गत 'वृद्धाश्रमात 'आई एका सर्वसाधारण महिला, श्रीमती कुंदाजी बोर्डे आणि त्यांची मुलगी मंजूषा बोर्डे यांचा सत्कार केला. मंजूषा बोर्डे यांनी एम एस्सी केमेस्ट्री पर्यंत शिक्षण घेतले असून, त्या आर.डी.जी. विद्यामंदिर येथे मुख्याध्यापिका म्हणून कार्यरत आहेत. त्यांचाही यावेळी विशेष सन्मान प्रांत अध्यक्ष लि. कल्पना देशमुख व क्लब अध्यक्ष राजेश्री सामानपुरे यांच्या हस्ते करण्यात आला. या कार्यक्रमाला पीडीपी हरविंदर कौर सेठीजी, लि. आशा पटेल, लि. उषा भादुका उपस्थित होत्या.

### बाजार समिती शेडवर व्यापाऱ्यांचा ताबा

**अकोला :** अनेक कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये व्यापाऱ्यांनी आपला माल किंवा गोदामाचे सामान शेतकऱ्यांसाठी आरक्षित असलेल्या शेडमध्ये ठेवल्यामुळे शेतकऱ्यांना आपला शेतमाल उघड्यावर ठेवावा लागतो. शेडबाहेर उघड्यावर ठेवलेला माल अवकाळी पाऊस किंवा वादळामुळे भिजून खराब होण्याची दाट शक्यता असते, ज्यामुळे शेतकऱ्यांना प्रचंड नुकसान होते. बाजार समित्यांकडून व्यापाऱ्यांना शेड दिले जाते. शेतकऱ्यांचा माल उघड्यावर किंवा पावसात भिजत राहत असल्याच्या स्थानिक पातळीवर तक्रारी समोर येत आहे.

**राम इढोळे,**
शेतकरी नेते, वाशीम

### जाहीर नोटीस

दि. ११.०५.२०२६

सर्वत्र बैंक, वित्तीय संस्था व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, आमचे पक्षकाराने खालील वर्णाची मालमत्ता १. श्री. अजय दिनकरराव देशपांडे, २. श्री. नित्येंद्र केशव ओक, ३. श्री. राजेश विष्णुपंत जोध, रा. जठारपेठ, अकोला, ता. जि. अकोला यांचे कडुन विकत घेण्याचा सौदा केलेला असुन लवकरच खरेदीचा व्यवहार पुर्ण करणार आहेत.

**मालमत्तेचे वर्णन :-** जि.प. र.डी. अकोला र.स.डी. प.स. अकोला ग्रा.प. व मौजे घुसर प्र.ता.जि. अकोला येथील शेत/गट क्र. ६४६, वर्ग १, एकुण ५.१६ हे. आर. पैकी नावे असलेली ०.८३ आर. शेत जमीन, झाडाझुडपासह व सर्व हक्कासह ज्याच्या चर्तुः सिमा पुर्वेस - देवकाबाई सारंगधर दांदाळे यांचे शेत, पश्चिमेस - आपातापा रोड उत्तरेस - करीम खान यांचे शेत, दक्षिणेस - सरकारी रस्ता त्यानंतर प्रल्हाद शेगोकार, त्र्यंबक मसने यांचे शेत

तरी सदर मालमत्तेवर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, बोजा व हितसंबंध असल्यास सात दिवसाचे आत लेखी पुराव्यानिशी कळवावे, असे न झाल्यास सदर मालमत्तेवर कुणाचाही हक्कसंबंध नाही असे समजुन आमचे पक्षकार खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व अश्या परिस्थीतीत कोणत्याही प्रकारेचा उजार किंवा अधिकार चालणार नाही. करीता ही जाहीर नोटीस.

अकोला.
दि. ११/०५/२०२६

**ॲड. पप्पू एस. मोरवाल, अकोला**

सिटी न्यूज सुपरफास्ट
वाशीम Express
जनभावना
शनिवार दि.२३ मे २०२६



सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
शनिवार, दि. २३ मे २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

# अनधिकृत कचरा डेपोवरून उमरखेड नगरपरिषदेवर नागरिकांचा रोष

प्रतिनिधी २३ मे

**उमरखेड** : प्रभाग क्रमांक ३ मधील मुरली शेठ यांच्या मळ्याजवळ सुरू असलेल्या अनधिकृत कचरा डेपोमुळे परिसरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असून, याबाबत वारंवार तक्रारी करूनही नगरपरिषद प्रशासनाकडून कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे.

स्थानिक नागरिक सुरेंद्रनाथ पंजाबराव दळवी यांनी २२ एप्रिल २०२६ रोजी नगरपरिषदेकडे लेखी अर्ज देऊन संबंधित ठिकाणी टाकला जाणारा कचरा तात्काळ बंद करण्याची मागणी केली होती. मात्र, एक महिना उलटूनही प्रशासनाने दुर्लक्ष केल्याचा आरोप त्यांनी केला आहे. यासंदर्भात त्यांनी मुख्याधिकाऱ्यांना स्मरणपत्रही दिले आहे.

सदर ठिकाणी साचणाऱ्या कचऱ्यामुळे दुर्गंधी पसरत असून लहान मुलांच्या आरोग्यावर परिणाम होत आहे. तसेच मुक्या जनावरांनाही धोका निर्माण झाला असून नागरिकांना त्रास सहन करावा लागत असल्याचे दळवी यांनी नमूद केले. शहराच्या स्वच्छतेसह सुशोभीकरणावरही या समस्येचा परिणाम होत असल्याचे त्यांनी सांगितले.



काही नागरिकांकडून घंटागाडीत कचरा न टाकता थेट या ठिकाणी कचरा टाकला जात असल्याने समस्या अधिक गंभीर बनत आहे. त्यामुळे नगरपरिषद प्रशासनाने स्वच्छतेबाबत जनजागृती मोहीम राबवावी, तसेच कचरा केवळ घंटागाडीतच टाकण्याबाबत प्रभावी प्रचार करावा, अशी मागणीही करण्यात आली आहे.

अनधिकृत कचरा डेपो तातडीने कायमस्वरूपी बंद करून त्याबाबत झालेल्या कार्यवाहीचा अहवाल द्यावा, अशी मागणी स्मरणपत्रातून करण्यात आली आहे. दरम्यान, या प्रकरणात नगरपरिषद प्रशासन कोणती भूमिका घेते, याकडे परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# पत्नीचा खून; पतीला जन्मठेप

## यवतमाळ जिल्हा सत्र न्यायालयाचा निकाल

प्रतिनिधी २३ मे

**यवतमाळ** : लहान सहान कारणांवरून पत्नीला मारहाण करून तिचा खून केल्याप्रकरणी आरोपीला जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली आहे. यवतमाळ येथील प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश एस. सी. गुनमाटे यांनी हा निकाल दिला.

देविदास प्रल्हाद राठोड (वय ३९, रा. कुंभारकिन्ही, ता. दारव्हा, जि. यवतमाळ) असे शिक्षा झालेल्या आरोपीचे नाव आहे. आरोपीने पत्नी सुषमा देविदास राठोड हिच्यावर सतत मारहाण व छळ करून २७ एप्रिल २०२२ रोजी रात्री साडेनऊच्या सुमारास



नेर परिसरातील पोंप्री रोडवरील शेखर मालानी यांच्या शेतातील विटभट्टीवर तिच्या डोक्यावर लोखंडी टिकासाला जोडलेला दांडा मारून गंभीर जखमी केले होते. यात महिलेचा मृत्यू झाला होता.

या प्रकरणी कलम ३२४ व ३०२ भा.दं.वि. अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला होता. तपास अधिकारी म्हणून पोलीस निरीक्षक रामकृष्ण पहाडसिंग जाधव आणि पोलीस हेडकॉन्स्टेबल राजेश पुंडलीक चौधरी यांनी तपास केला. न्यायालयात एकूण ११ साक्षीदार तपासण्यात आले.

साक्षी, परिस्थितीजन्य तसेच वैद्यकीय पुराव्याच्या आधारे न्यायालयाने आरोपीला दोषी ठरवत जन्मठेप व ५०० रुपयांच्या दंडाची शिक्षा सुनावली. सरकारी पक्षाच्या वतीने सहायक सरकारी वकील ॲड. नरेंद्र एन. पांडे यांनी काम पाहिले, तर पोलीस स्टेशन नेरचे कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले.

# ‘आपली हाक माझी साथ’ : तक्रार निवारणासाठी पालकमंत्री संजय राठोडांचा थेट संवाद उपक्रम

प्रतिनिधी २३ मे

**दिग्रस** : मतदारसंघातील नागरिकांच्या समस्या, तक्रारी आणि विविध मागण्यांचे जलद निराकरण व्हावे, यासाठी राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री तथा यवतमाळचे पालकमंत्री संजय राठोड यांनी “आपली हाक माझी साथ” हा उपक्रम सुरू केला आहे. या माध्यमातून दारव्हा, दिग्रस, नेर आणि यवतमाळ येथील संपर्क कार्यालयांमार्फत नागरिकांना थेट आपली मते आणि तक्रारी मांडता येणार आहेत.

गेल्या बावीस वर्षांपासून मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करताना जनतेने दाखविलेल्या विश्वासामुळे विकासकामांना गती मिळाल्याचे मंत्री राठोड यांनी प्रसिद्धीपत्रकात नमूद केले आहे. पालकमंत्री म्हणून काम करताना मतदारसंघातील प्रत्येक नागरिकाच्या अडचणी जाणून घेणे ही आपली जबाबदारी असल्याचे त्यांनी म्हटले आहे. या उपक्रमांतर्गत नागरिकांच्या तक्रारी, सामाजिक प्रश्न, विकासकामांच्या मागण्या आणि निवेदनांची संगणकीय नोंद केली जाणार असून प्रत्येक प्रकरणाला स्वतंत्र क्रमांक देण्यात येणार आहे. तालुकास्तरावर संबंधित विषयांचा पाठपुरावा केला जाणार असून आवश्यकतेनुसार जिल्हास्तरीय अधिकाऱ्यांमार्फतही कार्यवाही करण्यात येणार आहे.

समस्या प्रलंबित राहिल्यास संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांची संयुक्त बैठक घेऊन त्यावर तोडगा काढण्याचा प्रयत्न केला जाणार असल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे. दिग्रस, दारव्हा, नेर आणि यवतमाळ येथे सुरू करण्यात आलेली संपर्क कार्यालये सकाळी ११ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत नागरिकांसाठी खुली राहणार आहेत. या उपक्रमामुळे सामान्य नागरिकांना आपल्या समस्या थेट पालकमंत्र्यांपर्यंत पोहोचविण्याचे व्यासपीठ उपलब्ध होणार असून प्रशासन आणि नागरिक यांच्यातील संवाद अधिक प्रभावी होईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# तरुणीचा विनयभंग; एका आरोपीस अटक, दुसरा फरार

प्रतिनिधी २३ मे

**उमरखेड** : खासगी नोकरीच्या कामानिमित्त सहकारी तरुणीसोबत बाहेरगावी आलेल्या तरुणीचा विनयभंग करून तिच्या मैत्रिणीचा मोबाईल हिसकावल्याची धक्कादायक घटना ब्राम्हणगाव येथे घडली. या प्रकरणी उमरखेड पोलिसांनी दोन आरोपींविरुद्ध ॲट्रोसिटीसह विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला असून एका आरोपीस अटक करण्यात आली आहे. दुसरा आरोपी फरार असून पोलिस त्याचा शोध घेत आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित तरुणी ही खासगी नोकरीच्या निमित्ताने सहकारी मैत्रिणीसोबत



२१ मे रोजी ब्राम्हणगाव येथे आली होती. सायंकाळी साडेपाच वाजताच्या सुमारास गावाकडे परत जात असताना आरोपी अंबादास गोपाळा मोहिते याने त्यांना रस्त्यात अडवले. दुचाकीची चावी हिसकावून घेत “आपली जात एकच आहे, माझ्याशी लग्न कर” अशी जबरदस्तीची मागणी करत अश्लील भाषेत बोलत तरुणीचा हात पकडून तिच्या मानेला ओढत विनयभंग केल्याचा आरोप आहे.

यावेळी पीडितेसोबत असलेल्या मैत्रिणीच्या हातातील सुमारे दहा हजार रुपये किंमतीचा मोबाईलही आरोपीने हिसकावून घेतल्याचे तक्रारीत नमूद आहे. त्यानंतर आरोपी घरी जाऊन कोयता घेऊन आला व तरुणींचा पाठलाग करत “तुम्हाला खतम करतो” अशी धमकी दिली. पळून जात असताना त्याने झाडावर कोयता मारल्याची माहितीही समोर आली आहे.

घटनेची माहिती मिळताच पीडित तरुणीचे नातेवाईक व सहकारी घटनास्थळी पोहोचले. तरुणीच्या चुलत्याने आरोपीच्या घरी जाऊन जाब विचारला असता आरोपीचा चुलत भाऊ केशव मोहिते याने त्यांच्या नाकावर वीट फेकून मारल्याने ते जखमी झाले. या घटनेनंतर परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले असून मोठ्या प्रमाणात नागरिकांची गर्दी झाली होती.

परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन उमरखेड पोलीस ठाण्याच्या एपीआय सरिका राऊत यांनी अतिरिक्त पोलिस बंदोबस्त मागवला. बिटरगावचे ठाणेदार पांडुरंग शिंदे तसेच उमरखेड डीबी पथकाचे सागर इंगळे हेही पोलिस फौजफाट्यासह घटनास्थळी दाखल झाले. रात्री उशिरापर्यंत आरोपीच्या घराजवळ मोठा जमाव जमला होता.

अखेर पोलिसांनी घरात लपून बसलेल्या अंबादास मोहिते यास ताब्यात घेऊन अटक केली. तर दुसरा आरोपी केशव मोहिते हा फरार झाला असून त्याचा शोध सुरू आहे. आरोपींविरुद्ध ॲट्रोसिटीसह विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून जिल्हा पोलिस अधीक्षकांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलिस अधिकारी हनुमंतराव गायकवाड पुढील तपास करीत आहेत.

# अरुणावती नदीत एक दलघमी पाणी सोडण्याचे आदेश

## आ. राजू तोडसाम यांच्या पाठपुराव्याला यश

प्रतिनिधी २३ मे

**आर्णी** : तालुक्यातील पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर अरुणावती नदीपात्रात पाणी सोडण्याच्या आमदार राजू तोडसाम यांच्या मागणीला अखेर यश आले असून, जिल्हाधिकारी विकास मीना यांनी अरुणावती प्रकल्पातून एक दलघमी पाणी नदीपात्रात सोडण्याचे आदेश दिले आहेत.

त्यामुळे नदीकाठावरील गावांतील नागरिक, शेतकरी व जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न तात्पुरता मार्गी लागणार आहे.

अरुणावती नदीकाठावरील ग्रामपंचायतींमध्ये निर्माण झालेली पाणीटंचाई लक्षात घेता आमदार राजू तोडसाम यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे पत्राद्वारे मागणी केली होती.

या मागणीची दखल घेत सन २०२५-२६ च्या उन्हाळी टंचाई कालावधीसाठी राखीव ठेवण्यात आलेल्या दोन दलघमी पाणीसाठ्यातून



एक दलघमी पाणी नदीपात्रात सोडण्यास मंजुरी देण्यात आली.

जिल्हाधिकारी विकास मीना यांनी दिलेल्या आदेशानुसार अरुणावती प्रकल्पातील धरणातून हे पाणी सोडण्यात येणार असून, त्याचा लाभ नदीकाठावरील गावांतील ग्रामस्थ व जनावरांना होणार आहे. सध्या धरणामध्ये ७१.०९ दलघमी पाणीसाठा उपलब्ध असल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

दरम्यान, आमदार राजू तोडसाम यांच्या पाठपुराव्यामुळे पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटल्याने नदीकाठावरील शेतकरी, शेतमजूर आणि नागरिकांनी समाधान व्यक्त करत आमदारांचे आभार मानले आहेत.

> ■ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यवतमाळ यांच्या विनंतीनुसार हा निर्णय घेण्यात आला असून, पाणीपट्टी देयक भरण्याची जबाबदारीही जिल्हा परिषद प्रशासनाकडे सोपविण्यात आली आहे. यासंदर्भातील आदेश मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, अधीक्षक अभियंता सिंचन मंडळ, कार्यकारी अभियंता अरुणावती प्रकल्प दिग्रस, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार आर्णी तसेच ग्रामीण पाणीपुरवठा विभागाला पाठविण्यात आले आहेत.

# कत्तलीसाठी बांधून ठेवलेल्या पाच बैलांची सुटका

प्रतिनिधी २३ मे

**पांढरकवडा** : गोवंश जातीच्या जनावरांची कत्तल करण्याच्या तयारीत असल्याची गुप्त माहिती मिळताच पांढरकवडा पोलिसांनी मध्यरात्री धाड टाकून पाच बैलांची सुटका केली. या प्रकरणी तिघांविरुद्ध महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

२२ मे रोजी मध्यरात्री सुमारे १२.१५ वाजताच्या सुमारास मस्जिद वॉर्ड परिसरातील एका बंदिस्त पडक्या जागेत गोवंश जातीची जनावरे क्रूरतेने बांधून ठेवण्यात आल्याची माहिती पोलिसांना मिळाली. माहितीची खातरजमा होताच ठाणेदार एल. डी. तावरे यांनी तातडीने पथक रवाना केले.

सहाय्यक पोलिस निरीक्षक निलेश सरदार आणि उपनिरीक्षक नितीन सुशीर यांनी पोलिस कर्मचाऱ्यांसह मस्जिद वॉर्ड परिसरात छापा टाकला. तेथे शेख मुददसीर शेख कुरेशी यांच्या मालकीच्या बंदिस्त जागेत पाच बैल आढळून आले. अंदाजे १ लाख ५ हजार रुपये किमतीची ही जनावरे जप्त करून नगर परिषद पांढरकवडा येथील



कोंडवाड्यात हलविण्यात आली. या प्रकरणी शेख मुददसीर शेख कुरेशी (२५), मोहम्मद कैफ अब्दुल सलाम कुरेशी (२६) आणि शेख युसुफ शेख अयुब (५०, सर्व रा. मस्जिद वॉर्ड, पांढरकवडा) यांच्याविरुद्ध महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम १९७६ (सुधारित १९९५) तसेच प्राणी क्रूरता प्रतिबंधक अधिनियम १९६० अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई पोलिस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलिस अधीक्षक अशोक थोरात आणि उपविभागीय पोलिस अधिकारी रॉबीन बन्सल यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. ठाणेदार एल. डी. तावरे यांच्या नेतृत्वाखाली नितीन सुशीर, प्रमोद जुनुकर, विलास जाधव, रजनीकांत पाटील, सुनिल राठोड, सचिन काकडे आणि राजू मुत्तलवार यांनी कारवाईत सहभाग घेतला. पुढील तपास उपनिरीक्षक नितीन सुशीर करीत आहेत.

# उष्णतेच्या तडाख्यात वीज खंडित

प्रतिनिधी २३ मे

**आर्णी** : विदर्भात वाढलेल्या उष्णतेच्या लाटेमुळे नागरिकांचे जनजीवन विस्कळीत झाले असतानाच वारंवार खंडित होणाऱ्या वीज पुरवठ्यामुळे आर्णी शहरातील नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. तापमानाने ४२ ते ४५ अंश सेल्सिअसचा टप्पा गाठल्याने उकाडा असह्य झाला असून, त्यातच कमी-जास्त व्होल्टेज आणि सततच्या वीज खंडिततेमुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

दिवसाढवळ्या वीज पुरवठा खंडित होत असल्याने पंखे, कूलर, एसी यांसारखी उपकरणे बंद पडत आहेत. परिणामी लहान मुले, वृद्ध नागरिक तसेच रुग्णांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. रात्रीच्या वेळीही वीज पुरवठा सुरळीत नसल्याने नागरिकांची झोप उडाली असून उष्णतेमुळे हैराणी वाढली आहे.

आर्णी शहरातील लक्ष्मीनारायण लेआऊट आणि मानवता मंदिर परिसरात परिस्थिती अधिक गंभीर बनली आहे. मागील काही दिवसांपासून परिसरात कमी-जास्त



**आर्णीकर हैराण**

व्होल्टेजची समस्या निर्माण होत असल्याने घरगुती उपकरणांवर त्याचा परिणाम होत आहे. पंखे, फ्रिज, टीव्ही, एसी तसेच पाण्याच्या मोटारी योग्य प्रकारे कार्य करत नसल्याने उपकरणे जळण्याची भीती नागरिकांनी व्यक्त केली आहे.

या समस्येचा परिणाम विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर, घरगुती कामकाजावर तसेच स्थानिक व्यावसायिकांच्या दैनंदिन व्यवहारावरही होत असल्याचे नागरिकांनी सांगितले. दरम्यान, या गंभीर समस्येबाबत नागरिकांच्या वतीने फुलझडे साहेब आणि कांबळे साहेब यांना निवेदन देण्यात आले. यावेळी नगरसेवक अशपाक शेख, ॲड. जावेद शेख, फारुक धारीवाला, पत्रकार परवेज बेग, सिराज सोलंकी, ॲड. शाहरुख काझी, शाहेजाद शेख, नौशाद सय्यद, अंगत बोरले आदी उपस्थित होते. परिसरातील वीज लाईन, ट्रान्सफॉर्मर आणि तांत्रिक यंत्रणेची तातडीने तपासणी करून कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, तसेच भविष्यात अशा समस्या उद्भवू नयेत यासाठी प्रतिबंधात्मक पावले उचलावीत, अशी मागणी नागरिकांनी महावितरणकडे केली आहे.

# खतांसाठी शेतकऱ्यांची धावपळ; तात्काळ उपलब्धतेची मागणी




### तक्रार मिळाल्यास तत्काळ कारवाई : कृषी अधिकारी

> ■ ढाणकी सर्कलमधील कृषी केंद्रांवर पुरेसा खतसाठा उपलब्ध असल्याचा दावा मंडळ कृषी अधिकारी राजेश ढगारे यांनी केला आहे. कोणत्याही कृषी केंद्र चालकाकडून कृत्रिम खतटंचाई निर्माण करण्याचा प्रकार आढळल्यास शेतकऱ्यांनी तक्रार करावी, संबंधितांवर तत्काळ कारवाई करण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

प्रतिनिधी २३ मे

**उमरखेड** : खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर शेतकरी सध्या शेतीच्या तयारीत व्यस्त असताना बियाणे व खतांसाठी कृषी केंद्रांवर हेलपाटे मारावे लागत आहेत. मात्र आवश्यक खतांची वेळेवर उपलब्धता होत नसल्याने शेतकरी अडचणीत सापडला आहे. शेतकऱ्यांना योग्य दरात दर्जेदार बियाणे व खते तात्काळ उपलब्ध करून द्यावीत, अशी मागणी धानोरा येथील शेतकरी तथा सामाजिक कार्यकर्ते आदित्य पाटील काळे यांनी केली आहे.

यासंदर्भात त्यांनी ढाणकी सर्कलच्या मंडळ कृषी अधिकाऱ्यांना निवेदन सादर केले. ढाणकी परिसरातील कृषी केंद्रांवर युरिया, डीएपी, १०:२६:२६ तसेच मिश्र खतांचा पुरेसा साठा उपलब्ध करून देण्यात यावा, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. काही कृषी केंद्र चालकांकडून खत उपलब्ध नसल्याचे सांगितले जात असल्याने शेतकऱ्यांची गैरसोय होत असल्याचा आरोपही त्यांनी केला.

शेतकऱ्यांची हेळसांड थांबवण्यासाठी कृषी विभागाने परिस्थितीकडे गांभीर्याने लक्ष देऊन आवश्यक ती कार्यवाही करावी, अशी मागणी आदित्य पाटील काळे यांनी केली आहे.

# जिल्हास्तरीय रोजगार मेळावे समन्वय समितीच्या अध्यक्षपदी राजू पडगिलवार

प्रतिनिधी २३ मे

**यवतमाळ** : जिल्ह्यातील युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने जिल्हा कौशल विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राने जिल्हास्तरीय रोजगार मेळावे समन्वय समिती स्थापन केली आहे. या समितीचे अध्यक्ष म्हणून भारतीय जनता पार्टीचे जिल्हा महामंत्री राजू पडगिलवार यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

समितीत मुख्य कार्यकारी अधिकारी नगर परिषद, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, प्रादेशिक अधिकारी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ,



जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक, सहाय्यक कामगार आयुक्त आणि जिल्हा कार्यालयातील इतर वरिष्ठ अधिकारी सामील आहेत. या समितीच्या माध्यमातून रोजगार मेळावे आयोजित करून जास्तीत जास्त युवकांना रोजगाराच्या संधी मिळवून देणे हे मुख्य उद्दिष्ट आहे.

यावेळी कौशल विकास व रोजगार उद्योजकता विभागाचे प्रभारी उपायुक्त परेश जाधव आणि जिल्हा कौशल व रोजगार विकास अधिकारी शिरोडकर मॅडम यांनी राजू पडगिलवार यांचे जिल्हा कार्यालयात स्वागत केले. तसेच रोजगार मेळाव्याच्या यशस्वी आयोजनासाठी मंत्री मंगल प्रभात लोढा, माजी मंत्री रणजीत पाटील, माजी मंत्री मदन भाऊ येरावार, जिल्हाध्यक्ष प्रफुलजी चौहान आणि नितीन भुतडा यांचे आभार व्यक्त करण्यात आले.

राजू पडगिलवार यांच्या नेतृत्वाखाली आयोजित होणाऱ्या या मेळाव्याद्वारे यवतमाळमधील युवकांना रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होण्याची अपेक्षा आहे.

सिटी न्यूज अमरावती
शनिवार, दि. २३ मे २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

## दहशतवाद व हिंसाचारविरोधी दिवसानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात शपथ कार्यक्रम


**अमरावती:** भारताचे माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्यावर झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर दरवर्षी २१ मे रोजी 'दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिवस' साजरा केला जातो. यानिमित आज जिल्हाधिकारी कार्यालयात अपर जिल्हाधिकारी गोविंदा दानेज यांनी दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिवसाची अधिकारी-कर्मचाऱ्यांना शपथ दिली.

दहशतवादाचा व हिंसाचाराचा सर्व शक्तीनिशी मुकाबला करण्याची गांभीर्यपूर्वक प्रतिज्ञा यावेळी सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी घेतली. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी संतोष काकडे, यांच्यासह अन्य अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

# अधिकाऱ्यांनी ग्रामस्तरावरील महसुली कामकाजांची तपासणी करावी

**♦ अपर मुख्य सचिव खारगे यांनी घेतला कामकाजांचा आढावा ♦ महाराजस्व अभियान प्रभावीपणे राबवा ♦ आरटीएस अंतर्गत अधिसूचित सेवा प्राधान्याने पुरवा**

प्रतिनिधी २३ मे



**अमरावती:** राज्य शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजनांची अंमलबजावणी प्रभावीपणे होण्यासाठी प्रत्येक महसूल अधिकाऱ्यांनी आठवड्यातून एक दिवस ग्राम स्तरावरील महसूल यंत्रणांना तसेच प्रत्यक्ष कार्यस्थळी भेट देऊन अनुषंगीक सर्व बाबींची तपासणी करावी. तपासणीअंती लक्षात आलेल्या अडचणी किंवा उणीवांची कारणमीमांसा जाणून धोरणात्मक बाबी संदर्भात शासनाला कळवावे, असे निर्देश अपर मुख्य सचिव (महसूल) विकास खारगे यांनी संबधित जिल्हा प्रशासनाला दिले.

खारगे यांनी आज अमरावती जिल्हा दौरा दरम्यान जिल्ह्यातील उपविभागीय अधिकारी, तहसीलदार कार्यालय, तलाठी कार्यालय, सह जिल्हा निबंधक व मुद्रांक जिल्हाधिकारी, भूमी अभिलेख आदी कार्यालयांना प्रत्यक्ष भेट देऊन तेथील कामकाज, दस्तऐवज, ई-ऑफीस प्रणालीची तपासणी केली. त्यानंतर विभागीय आयुक्त कार्यालयात आयोजित बैठकीत खारगे यांनी अमरावती विभागाचा महसूल कामकाजांचा आढावा घेतला. त्यावेळी ते बोलत होते. विभागीय आयुक्त नयना गुंडे, अमरावतीचे जिल्हाधिकारी आशिष येरेकर, अपर आयुक्त संजय जाधव, सुरज वाघमारे, नगरविकास प्रशासनाच्या उपायुक्त माधुरी कडू प्रत्यक्षरित्या तसेच यवतमाळचे जिल्हाधिकारी विकास मीना, वाशिमचे जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर, अकोल्याच्या जिल्हाधिकारी वर्षा मीना, बुलढाण्याचे जिल्हाधिकारी डॉ. प्रवीणकुमार देवरे आदी दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून बैठकीला उपस्थित होते.

खारगे म्हणाले की, महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत महसूल विभागाच्या अधिसूचित सेवा नागरिकांना प्राधान्याने पुरविल्या जाणार याची दक्षता घ्यावी. जिल्हा प्रशासनाने जिल्ह्यातील सेतू सुविधा केंद्रांना भेट देऊन नागरिकांना दिल्या जाणाऱ्या सेवा, दाखले विहित वेळेत दिले जातात किंवा कसे याबाबत तपासणी करावी. भुसंपादन कायदा अंतर्गत सार्वजनिक प्रकल्पांसाठी जमीन संपादित करताना जमीन मालकांना योग्य मोबदला आणि त्यांचे पुनर्वसन योग्यरितीने झाल्याचे खातरजमा करावी. तसेच यातून प्राप्त होणाऱ्या महसूलातून जिल्ह्यातील महत्वाचे प्रकल्प, उपक्रम पूर्ण करावे. जिल्ह्याच्या महसूल गोळा करण्याच्या लक्षांक पूर्ततेसाठी जबाबदारीपूर्वक कार्य करावे, असे त्यांनी सांगितले.

ते पुढे म्हणाले की, महसूल, भुमी अभिलेख व नोंदणी-मुद्रांक विभाग ही प्रशासनाची महत्वाची खाते असून जमीन व्यवहाराशी निगडीत सर्व कामे या विभागाव्दारे केली जातात. या विभागाव्दारे पुरविण्यात येणाऱ्या अधिसूचित सेवा सामान्य नागरिकांना सहज व सुलभरित्या उपलब्ध होतील, यादृष्टीने संबंधित विभागांनी एकत्र येवून कार्य करावे. संबंधित जिल्हाधिकारी यांनी संयुक्त तपासणी दौरा करुन राज्य शासनाच्या योजना, उपक्रम, मोहिम यशस्वीरित्या राबवाव्यात. जिल्ह्यात महाराजस्व समाधान शिबिरांचे उत्तमरित्या आयोजन करुन गरजूंना आवश्यक कागदपत्रे, दाखले, ७/१२ उतारा आदी उपलब्ध करुन द्यावेत. समाजातील गोर-गरीब नागरिकांच्या क्षेत्रीय स्तरावरील अडचणी व समस्यां जाणून त्यांच्या सोयी-सुविधांसाठी जे-जे चांगले करता येईल, यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करावे, असे आवाहन यांनी यावेळी केले.

यावेळी बैठकीत अपर आयुक्त जाधव यांनी अमरावती विभागाची संक्षिप्त माहिती सादरीकरणाच्या माध्यमातून अपर मुख्य सचिवांना दिली. अमरावती विभगातील सिलींग जमीन, भूदान जमीन, कुळकायदाच्या जमीनी अधिकृतपणे भोगवटदार वर्ग २ मधून वर्ग १ मध्ये रुपांतरीत करणे, देवस्थान इनाम जमीनी, आदिवासी जमीनी, छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान, वनक्षेत्राच्या महसूली अभिलेख, गाव नमुना, ७/१२ मधील भोगवटदार सदरी वनक्षेत्राच्या नोंदी, फेरफार निर्गती, ॲग्रीस्टॅक नोंदणी, शासकीय जमीनीवरील निवासी प्रयोजनासाठीची अतिक्रमणे नियमानुकूल करणे, वाळू धोरण व वाळूघाट लिलाव, मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजना, अर्धन्यायीक, विभागीय चौकशी प्रकरणे, पाणी टंचाई कृती आराखडा, आपले सरकार पोर्टल आदी महत्वाच्या विषयांबाबत अमरावती विभागाचा सविस्तर आढावा श्री. खारगे यांनी यावेळी घेतला.

## सहाय्यक गट विकास अधिकारी आणि उपलेखापाल पदांसाठी २५ मे पासून विभागीय परीक्षा

प्रतिनिधी २३ मे

**अमरावती:** महाराष्ट्र विकास सेवा अंतर्गत सहाय्यक गट विकास अधिकारी (गट-ब) या पदावर पदोन्नतीने नियुक्त झालेल्या व्यक्तींना संबंधित पदावर कायम करण्यासाठी, तसेच जिल्हा परिषद सेवेतील उपलेखापाल पदावरील पदोन्नती व नामनिर्देशनासाठीच्या विभागीय परीक्षांचे आयोजन करण्यात आले आहे. कोकण विभागाच्या अप्पर आयुक्त कार्यालय (आस्थापना) यांच्या वतीने ही माहिती देण्यात आली आहे. या परीक्षा दि. २५, २६ आणि २७ मे २०२६ रोजी पार पडणार असून, यासाठी नवीन पनवेल येथील एका प्रमुख परीक्षा केंद्राची निवड करण्यात आली आहे.

महाराष्ट्र विकास सेवा सहाय्यक गट विकास अधिकारी (गट-ब) या पदावरील उमेदवारांच्या स्थिरीकरणासाठीची परीक्षा दि. २५, २६ आणि २७ मे २०२६ या तीन दिवसांच्या कालावधीत घेतली जाईल. याच सोबतीने जिल्हा परिषद सेवेतील उपलेखापाल पदावर पदोन्नती मिळवण्यासाठी आणि नामनिर्देशनाव्दारे थेट नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांसाठीची विहित परीक्षा दि. २५, २६ आणि २७ मे २०२६ या दोन दिवसांत घेतली जाणार आहे. या दोन्ही महत्त्वाच्या परीक्षा नवीन पनवेल, तालुका पनवेल, जिल्हा रायगड येथील ठचांगू काना ठाकूर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयठ या परीक्षा केंद्रावर आयोजित करण्यात आल्या आहेत.

या सर्व परीक्षांचे प्रवेश पत्र (हॉल तिकीट) संबंधित विभागीय आयुक्तांकडे आधीच रवाना करण्यात आले आहेत. ज्या उमेदवारांना काही कारणास्तव अद्याप परीक्षेचे प्रवेश पत्र प्राप्त झाले नसेल, त्यांनी विनाविलंब आपल्या संबंधित विभागीय आयुक्त कार्यालयाशी त्वरित संपर्क साधून ते मिळवून घ्यावे. महाराष्ट्र राज्यातील सर्व जिल्हा परिषदांमधील संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी या महत्त्वपूर्ण तारखांची आणि सूचनांची नोंद घेऊन वेळेत परीक्षेला उपस्थित राहावे, असे आवाहन कोकण विभागाचे अपर आयुक्त (आस्थापना) मिनल कुटे यांनी केले आहे.

## महावितरणचे संचालक राजेंद्र पवार यांचा 'ग्लोबल एचआर लीडर ऑफ द इयर'ने सन्मान

**♦ नवी दिल्लीतील जागतिक ऊर्जा नेतृत्व परिषदेत मानाचा पुरस्कार**

प्रतिनिधी २३ मे




**अमरावती :** जगभरातील सरकारी, औद्योगिक, शैक्षणिक व संशोधन संस्थांच्या समन्वयातून ऊर्जा व पर्यावरण क्षेत्रात काम करणाऱ्या ग्लोबल एनर्जी ॲण्ड एन्व्हायरमेंट फाउंडेशनच्या (जीईईएफ) वतीने महावितरणचे संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार यांचा विद्युत क्षेत्रात मानव संसाधनातील कामगिरीसाठी 'ग्लोबल एचआर लीडर ऑफ द इयर-२०२६' पुरस्काराने गौरव करण्यात आला.

'जीईईएफ'च्या वतीने शुक्रवारी (दि. २२) नवी दिल्ली येथे 'जागतिक ऊर्जा नेतृत्व परिषद-२०२६' चे आयोजन करण्यात आले. या परिषदेत स्वच्छ आणि हरित ऊर्जा तंत्रज्ञानाचा प्रसार करण्यासाठी विविध तज्ज्ञ सहभागी झाले होते व प्रामुख्याने विकसित भारत आणि ऊर्जा सुरक्षितता यावर विचारमंथन झाले.

महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांच्या मार्गदर्शनात संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार यांनी ८६ हजार कर्मचारी आणि सव्वा तीन कोटी वीजग्राहकांना केंद्रस्थानी ठेवून विद्युत सुरक्षिततेचे उपक्रम व त्यासाठी जागतिक विक्रमी लोकसहभाग, कर्मचारी कल्याण व प्रोत्साहनपर धोरण, कर्मचारी संघटना संवाद-उपक्रम, आधुनिक कौशल्य विकास प्रशिक्षण, मानव संसाधनामध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, महिला कर्मचारी सन्मान व सक्षमीकरण, कर्मचाऱ्यांना हरित ऊर्जेसाठी प्रोत्साहन यासारखे कर्मचारी-हितैषी अनेक उपक्रम राबविले. व्यवस्थापनाच्या मंजुरीने धोरणात्मक निर्णय अंमलात आणले.

या कामगिरीचे मूल्यमापन करून 'जीईईएफ'च्या निवड समितीकडून जागतिक परिषदेत पुरस्कार जाहीर करण्यात आला. यात विद्युत क्षेत्रातील मनुष्यबळ विकासाच्या योगदानासाठी महावितरणचे संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार यांचा 'ग्लोबल एचआर लीडर ऑफ द इयर-२०२६' पुरस्काराने सन्मान करण्यात आला. भारतातील रशियन फेडरेशनचे उपायुक्त डॉ. एव्हगेनी ग्रिव्हा, आइसलँडचे राजदूत बेनेडिक्ट होस्कुल्डसन आणि नीती आयोगाचे माजी सदस्य डॉ. विजयकुमार सारस्वत यांच्याहस्ते पवार यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

## EWS अटींच्या तर्कवितर्कामुळे अमरावतीत प्लॉटधारक वेठीस

**एकता प्रॉपर्टी ब्रोकर्स ॲन्ड लॅन्ड डेव्हलपर्स असोसिएशनचा प्रशासनावर गंभीर आरोप**

प्रतिनिधी २३ मे

**अमरावती :** महाराष्ट्र शासनाच्या UDCPR नियमावलीतील EWS संदर्भातील अटींचा चुकीचा अर्थ लावून फक्त अमरावती जिल्ह्यात प्लॉटधारकांना वेठीस धरले जात असल्याचा गंभीर आरोप अमरावती एकता प्रॉपर्टी ब्रोकर्स ॲन्ड लॅन्ड डेव्हलपर्स असोसिएशनने केला आहे. राज्यातील इतर जिल्ह्यांमध्ये EWS प्लॉटचे खरेदीखत नियमितपणे नोंदविले जात असताना अमरावती जिल्ह्यात मात्र खरेदी-विक्री प्रक्रियेला अडथळे निर्माण होत असल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे.

असोसिएशनच्या मते, UDCPR मध्ये नमूद केलेल्या काही अटींचे स्थानिक स्तरावर तर्कवितर्क लावले जात असून त्यामुळे व्यवहारिक अडचणी मोठ्या प्रमाणात वाढल्या आहेत. प्लॉट मालकीवर कायदेशीर बंधने निर्माण होत असल्याने सामान्य नागरिक आर्थिक व मानसिक तणावात सापडत आहेत. विशेषतः मेडिकल इमर्जन्सीमुळे स्वतःचा प्लॉट विक्री करण्यासाठी आलेल्या एका व्यक्तीची विक्री प्रक्रिया थांबल्याने तो गंभीर आर्थिक संकटात सापडल्याचे उदाहरणही समोर आले आहे.

यापूर्वी मालमत्तेच्या ओळखीवर किंवा उत्पन्नाच्या आधारावर अशा प्रकारच्या अटी लागू करण्यात आल्या नव्हत्या. त्यामुळे समाजात आर्थिक स्थितीनुसार विभागणी होत असल्याची भावना निर्माण होत असल्याचे असोसिएशनने म्हटले आहे.

**सांख्यिकीय विश्लेषणातून धक्कादायक वास्तव**

असोसिएशनने सादर केलेल्या माहितीनुसार, भारतातील १० लाख रुपयांपेक्षा अधिक उत्पन्न असलेले करदाते सुमारे ८२.६ लाख आहेत. त्यानुसार अमरावती जिल्ह्याच्या लोकसंख्येच्या प्रमाणात अंदाजे २५ हजारांपेक्षा कमी नागरिक उच्च उत्पन्न गटात येतात. म्हणजेच जिल्ह्यातील जवळपास ९९ टक्के लोकसंख्या EWS श्रेणीत मोडते. अशा परिस्थितीत केवळ १ टक्के लोकांच्या निकषावर संपूर्ण व्यवहार थांबविणे अन्यायकारक असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

**UDCPR पासून विचलनचा आरोप**

असोसिएशनने स्पष्ट केले की, महाराष्ट्र शासनाच्या एकात्मिक विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीनुसार मालमत्तेच्या कायदेशीर दस्तऐवजावर किंवा गाव नमुना ७/१२ वर EWS चा उल्लेख करणे बंधनकारक नसताना अमरावतीत वेगळीच भूमिका घेतली जात आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण झाला असून प्रशासनाने तातडीने स्पष्ट आदेश काढून खरेदी-विक्री प्रक्रिया सुरळीत करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. या बातमीचा आढावा घेतला आमचे प्रतिनिधी सतिश पाटील यांनी केले.

## जुन्या वादातून चाकू हल्ल्याची घटना

प्रतिनिधी २३ मे

**चांदुरबाजार :** २२/०५/२०२६ रोजी सायंकाळी सुमारे ६.३० वाजताच्या दरम्यान पूर्णा नगर येथील आठवडी बाजार परिसरात ओळखीतील व्यक्तींमध्ये जुन्या पैशाच्या व्यवहारातून वाद होऊन मारामारी व चाकूहल्ल्याची घटना घडली.

फिरोज खान पठाण (४३)रा. हातखेडा हे आठवडी बाजार परिसरात गेले असता त्यांना ओळखीचा अमोल आमझरे(२७) भेटला. उधारीच्या पैशाच्या कारणावरून दोघांमध्ये वाद झाला. त्यानंतर फिरोज खान यांनी त्यांचे मित्र राजिक उर्फ मुकद्दर अहमद कुरेशी (३८)व मुजम्मिल अहमद कुरेशी (२५) यांना झालेल्या प्रकाराची माहिती दिली. अमोल व संबंधिताना समजावण्यासाठी हे सर्वजण पुन्हा बाजार परिसरात गेले असता बोलाचालीदरम्यान वाद वाढून मारामारी झाली. त्यावेळी धारदार शस्त्राने हल्ला झाल्याने राजिक उर्फ मुकद्दर अहमद कुरेशी व मुजम्मिल अहमद यांच्या पोटावर मार लागून ते जखमी झाले.

दोन्ही जखमींवर अमरावतीं येथे खाजगी दवाखान्यात उपचार सुरू असून उपचारानंतर त्यांची प्रकृती स्थिर आहे.

घटनेची माहिती मिळताच आसेगाव पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेऊन परिस्थिती नियंत्रणात आणली. परिसरात आवश्यक पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला असून शांतता आहे.

या प्रकरणी पोलीस स्टेशन आसेगाव येथे फिर्यादी फिरोज खान शाहबाज खान पठाण (४३) रा. हातखेडा ता. भातकुली यांच्या तक्रारीवरून पो. स्टे. आसेगाव येथे चार आरोपींविरुद्ध क. १०९(१), ११८(२), २९६, ३(५) ॅए अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपींपैकी अमोल श्रीकृष्ण आमझरे (वय २७) व गौरव सुरेश आमझरे (वय २५) दोन्ही रा. पूर्णानगर यांना अटक करण्यात आली असून उर्वरित दोन आरोपींचा शोध सुरू आहे.

अमरावती ग्रामीण जिल्हा पोलीस दलातर्फे नागरिकांना कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता शांतता राखण्याचे व पोलिसांना सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

## एकाच वेळेस दोन बस फेल पडल्याने अमरावतीत वाहतूक कोंडी

**वाहक चालकांनी केले पोलिसांचे काम**

प्रतिनिधी २३ मे

**अमरावती :** अमरावतीत नवीन लाल परी बसेस दाखल झाले आहेत. मात्र या सुद्धा फेल पडत असून एकाच वेळेस चंद्रपूर आगाराची व वर्धमान नगर नागपूर आगाराची बस अमरावती शहरातील शिवटेकडी जवळ अचानक बंद पडल्याने जवळपास पंधरा ते वीस मिनिटांपर्यंत शहरात वाहतूक कोंडी निर्माण झाली होती.

मात्र या ठिकाणी उन्हाचा तडाका असल्याने वाहतूक पोलीस नसल्याने चालक वाहकांनाच बसेस नियमात आणण्यासाठी वाहतूक पोलिसांचे काम करावे लागले.

बस फेल पडल्याने अनेक बस चालकाने बसेस रॉंग साईडने टाकल्याने आणखी न वाहतूक कोंडी निर्माण झाली. अमरावती मध्यवर्ती आगार जवळच असल्याने परतवाडा, नागपूर, अकोला, वर्धा व इतर जिल्ह्यात जाणाऱ्या बसेस रस्त्यावर थांबल्या होत्या. काही वेळानंतर वाहतूक कोंडी सुरळीत झाली असली तरी एसटी महामंडळाच्या बेजबाबदारपणामुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागत असल्याचे चित्र समोर आले आहे.

## बोर्डी कोल्हापुरी बंधाऱ्याच्या भिंतीला तडे, मुख्य शेत रस्ताच गेला वाहून

पवन बेलसरे २३ मे



**अकोट:** बोर्डी गावाच्या घोगानदी ही सातपुड्याच्या मुख्य पर्वतरांगांमधून फुल भरून उताराच्या वेगाच्या दिशेने वाहते याच नदीवर संरक्षण भिंत न बांधता कोल्हापुरी बंधाऱ्याचे निष्कृष्ट दर्जाहीन काम करण्यात आले आहे.

अकोट यांनी कोल्हापुरी बंधाऱ्यांचा बोजबारा वाजवत शेतकरी वैतागून सोडले आहेत. ज्या ठिकाणी बंधाऱ्याची आवश्यकता नाही. अशा चुकीच्या ठिकाणी बंधारा बांधून शेतकऱ्यांचे रकमेची कशी विल्हेवाट लावली याचे जिवंत उदाहरण घोगा नदीवरील निकृष्ट दर्जाहीन केलेल्या कोल्हापुरी बंधाऱ्याच्या बांधकामावरून स्पष्ट झाले आहे. भिंतीला मोठ मोठी तळे गेल्याने मातीचा भराव खचत आहे त्यामुळे अधिकारी शेतकऱ्याचे कुटुंबच नष्ट करण्याच्या मार्गावर उठले आहेत. कशाही पद्धतीचे थातुर्मातुर कामे करा

तरीही शासनाच्या रकमेचा बोरबाजा वाजवा व ती हडप करा. शेतकऱ्यांच्या हिताची शासनाकडून ठराविकच योजना शेतकऱ्यांसाठी लाभदायक ठरते परंतु हीच योजना शेतकऱ्यांसाठी घातक व त्यांना बंधाऱ्याच्या वाहत्या पाण्यात डुबवणारी ठरली आहे,

**अधिकाऱ्यांचा प्रताप**

अहो बंधारा नदीत बांधायचा किंवा नदीच्या बाहेर बांधायचा: किंवा बंधाऱ्यांमध्ये पाणीच नाही थांबले पाहिजे अशा पद्धतीने बांधायचा.?

**बंधारा कोठे तर.. पाण्याचा मार्ग कोठे**

एवढेही अधिकाऱ्यांना कळले नाही.! ही खूप मोठी अधिकाऱ्यांसाठी चिंता जनक बाब आहे.

घोगा नदीवर बांधलेला बंधारा हा शंभर टक्के चुकीचा बांधण्यात आला शेतकऱ्यांसाठी शेत रस्ताच नाही मोठी समस्या शेतकऱ्यांच्या ऐन पेरणीच्या तोंडावर शेती कशी करावी चिंताजनक बाप समोर आली. ज्या शेतकऱ्यांनी बांधकाम करताना बांधकाम अडविण्याचे प्रयत्न केले. त्यांनाच शासकीय कामात अडथळा आणला म्हणून तुमच्यावर गुन्हे दाखल करण्यात येतील अशी धोकादाडी करून अति अल्प शेतकऱ्यांना वेठीस धरून भ्रष्टाचाराने बरबटलेल्या अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांचे काहीच ऐकले नाही काहीतरी काम करावे लागते म्हणून करावे.

अधिकाऱ्यांची शेतकऱ्यांसाठी परिभाषा तुम्हाला पूर संरक्षण भिंत बांधून देतो काम अडू नका असे भूलथापिचे पाण्यात विरघळणारे आश्वासन त्यांना दिल्या गेले व काम अपूर्ण अवस्थेत सोडून कधी साहेबाचे ठेकेदार साहित्यसह कधी पलायन झाले आम्हाला साधे समजले पण नाही. बारा महिन्यापासून अधिकारी परिसरात प्रगटलाच नाही त्यामुळे आज दि.१९ मे रोजी अन्यायग्रस्त शेतकऱ्यांनी अकोट येथे तक्रार सादर केली आहे. जर आकोट मृद व जलसंपदा उपविभागीय भ्रष्ट अधिकाऱ्यांनी तात्काळ काम न केल्यास आम्ही आमरण उपोषण रस्ता जाम केल्याशिवाय राहणार नाही, असा सर्व शेतकऱ्यांनी इशारा दिला आहे.

> मागील वर्षापासून मोरे सर, भुईभार सर माझ्या शेताला पूर संरक्षण भिंत बांधून देतो म्हणून बारा महिन्यापासून वाट पाहत आहो. उन्हाळा संपला तरीही एकाही अधिकाऱ्याने तोंड दाखविले नाही.
>
> **विजय महादेव कसूरकर**
> अन्यायग्रस्त शेतकरी, बोर्डी

> २०२५ च्या पावसामध्ये माझ्या शेतातील पराटी सोयाबीन उभे पीक आमच्या डोळयापुढे नदीच्या पाण्यामुळे वाहून गेले शेतात खूप मोठे मोठे गड्डे पडले. तात्काळ नदीचे खोलीकरण व पूर संरक्षण भिंत बांधून द्यावे अन्यथा आम्हाला आत्महत्या केल्या शिवाय कोणताही पर्याय उरणार नाही.
>
> **सौ. ज्योती संजय चौधरी**
> अन्यायग्रस्त शेतकरी महिला बोर्डी.

# जनभावना



# दुर्गा दुर्गतिनाशीनी राजकारणातील रणरागिणी विदर्भाची वाघीणी





खरं तर भावनाताईंचे वडील पहिल्यापासूनच राजकारणात सक्रिय. शिवसेना जिल्ह्यात सर्वव्यापी करणारा जिल्हाप्रमुख म्हणून दस्तुरखुद्द हिंदूहृदयसम्राट पूजनीय बाळासाहेब ठाकरेंनी त्यांचा सत्कार केला होता आणि त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून त्यांना खासदारकीही बहाल केली. तेच संस्कार आ. भावनाताईंवर झाल्यामुळे महाविद्यालयीन जीवनापासुनच भावनाताई कट्टर शिवसैनिक. आक्रमकता, संघर्ष, रोखठोकपणा, निडर आणि स्पष्टता, लढावु आणि स्वाभिमानी वृत्ती, कार्यकौशल्य आणि समाजसेवाभाव त्यांच्यात सहज संस्कारित झाला. या सर्व गुणविशेषांना फुलोरा चढला १०ऑक्टोबर१९९९ ला तेराव्या लोकसभेच्या सदस्य या नात्याने खासदार म्हणून त्यांनी शपथ घेतली. वय वर्ष अवघे २६..लोकसभेतील सर्वात युवा खासदार. १९९९पासून सुरू झालेला हा जगन्नाथाचा रथ 'वादळाची गती आणि ध्येयाचे भान' ठेवून धावू लागला तो आजपर्यंत कधि थाबंलाच नाही. खासदारकीच्या तिकीटाच्या यावेळेस तो थांबविण्यात आला. मात्र तेही विधान परिषदेवर आमदार होवून विजयी रथ कायम ठेवला. तर आता सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण विभागाच्या राज्य तपासणी व सनियंत्रण समितीच्या सदस्यपदी निवड झाली आहे.















## ...संकटभोग अन् राजयोग !



योग आल्याशिवाय कुठलीही गोष्ट साध्य होत नाही असे म्हटले जाते. विविध घटना तसेच अनुभवावरून हे वेळोवेळी सिध्द झालेले आपण पाहतो. दोन वर्षापासून ईडीची पिडा मागे लागल्याने खा. भावनाताई गवळी अग्नीदिव्य संकटातून गेल्या सलग पाचव्यांदा खा. म्हणून विराजमान झालेल्या खा. भावनाताई गवळी या सुध्दा राजयोग घेऊनच जन्माला आल्याचे दिसून येत आहे. त्यांचे वडील माजी खा. स्व. पुंडलीकराव गवळी यांच्याकडून राजकारणाचे बाळकडू घेऊन वयाच्या २६ व्या वर्षी १९९९ मध्ये पहिल्यांदा लोकसभेत जाणाऱ्या त्या पहिल्या भारतीय महिला ठरल्या . २०२४ ला खासदारकीचे तिकीट काटले तरी विधान परिषदेवर आमदारकी मिळविली आहे. त्यामुळे त्यांच्या जीवनात संकटभोग अन् राजयोग कायम आहे .



मन मंदिरा ! तेजाने उजळून घेई साधका,
संवेदना, संवादे सहवेदना जपताना!
तळहाताच्या रेषांनी सहज सुखा
कां भोगी कुणी!
स्वयं प्रकाशी तु तारा,
चैतन्याचा गाभारा!
भर पंखातुन स्वप्न उद्‌याचे,
झेप घे रे पाखरा,
उजळून घेई साधका!
तस्मात्उत्तिष्ठ भावना त्वं,
यूद्धाय कृत निश्चय!
चाललो ध्येयपथ आम्ही, वाटू द्‌या कुणाला कांही!
ताई, वाढदिवसाच्या खुप शुभेच्छा!









## पथका अंतिम लक्ष नही है, सिंहासन चढते जाना !

## आ. भावनाताई गवळी: जिवेत शरद: शतम्!

विधान परिषदेच्या आमदार भावनाताई गवळी यांचा उद्या वाढदिवस. त्यांना वाढदिवसाच्या खुप शुभेच्छा!

दुर्दैवाने यंदा त्यांना उमेदवारी मिळाली नाही. कदाचित परमेश्वरी योजना याहून विशेष असेल. पण तिकीट नाकारले तरी जी आपल्या मार्गावरून भरकटली नाही त्या खंबिर, संयमी आणि प्रगल्भ नेतृत्वाचे नाव आहे भावनाताई गवळी.

अनेक पक्षांनी उमेदवारी घ्या म्हणून त्यांच्याशी संपर्क केला पण

' पथका अंतिम लक्ष नहीं है ,सिंहासन चढते जाना । सब समाजको लीए साथमे ,आगेही बढते जाना !

केवळ सत्ताप्राप्ती हे माझं ध्येय नसुन ८०टक्के समाजकारण २०टक्के राजकारण हा माझ्यावर झालेला हिंदूहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख वं. बाळासाहेब ठाकरे यांचा आणि माझे वडील स्व. पुंडलिकराव गवळी यांचा संस्कार आहे. उमेदवारी न मिळाल्याचा खेद आहे पण नाराजी अजिबात नाही. मी भगव्यासाठीच आजवर लढले आणि पुढेही लढत राहाणार . हे ठणकावून सांगते त्या प्रचंड चंडीचे नाव आहे भावना गवळी .

खरं तर भावनाताईंचे वडील पहिल्यापासूनच राजकारणात सक्रिय. शिवसेना जिल्ह्यात सर्वव्यापी करणारा जिल्हाप्रमुख म्हणून दस्तुरखुद्द हिंदूहृदयसम्राट पूजनीय बाळासाहेब ठाकरेंनी त्यांचा सत्कार केला होता आणि त्यांना खासदारही केले.

तेच संस्कार आ. भावनाताईंवर झाल्यामुळे महाविद्यालयीन जीवनापासुनच भावनाताई कट्टर शिवसैनिक.

आक्रमकता, संघर्ष, रोखठोकपणा, निडर आणि स्पष्टता, लढावु आणि स्वाभिमानी वृत्ती, कार्यकौशल्य आणि समाजसेवाभाव त्यांच्यात सहज संस्कारित झाला. या सर्व गुणविशेषांना फुलोरा चढला १०ऑक्टोबर१९९९ ला तेराव्या लोकसभेच्या सदस्य या नात्याने खासदार म्हणून त्यांनी शपथ घेतली. वय वर्ष अवघे २६. लोकसभेतील सर्वात युवा खासदार. १९९९पासून सुरू झालेला हा जगन्नाथाचा रथ 'वादळाची गती आणि ध्येयाचे भान' ठेवून धावू लागला तो आजपर्यंत कधि थाम्बलाच नाही. पहाडा एव्हढे प्रचंड विरोधक, विविध समस्यांची वादळे, ढउतार, यशापयश, ऊनसावल्या, वादळवारा यांना न डगमगता 'अनादी मी अनंत मी ' या निर्धाराने पाय रोवून उभ्या राहिल्या त्या हिमालयाच नावं आहे आ. भावना गवळी. माझ्यासकट अनेकजण साक्षीदार आहेत खा. भावनाताईंच्या थक्क करणाऱ्या प्रवासाचे. अखंड आणि अभंग ५ वेळा लोकसभेच्या मुख्यप्रवेशद्वारातुन प्रवेश करायचा म्हणजे सोपंच नव्हे तर बहुतेक अशक्यप्रायही!

बोटांवर मोजण्याइतके नेते असतील या विक्रमाचे मानकरी. सर्वात युवा आणि सर्वाधिक कालावधीचा खासदार हा मान सध्या तरी भावनाताईंनाच!



सोपं नाही हे सर्व अंकुरित होण्यासाठी स्वतःला गाडून घ्यावे लागते. व्यक्तिगत जीवनावर तुळशीपत्र ठेऊन 'लोकांसाठी जगात जगती' आयुष्य जगायचं. 'आराम हराम हैं' जीवनात उतरवायच . खासदार उपाधी असली तरी कष्ट, वदवद ,ना झोप पुरेशी ना जेवण. वाटेवर काटे वेचत वेचत मार्गक्रमण. या सर्वांवर मात करत अभ्यास म्हणाल तर भल्याभल्यांना फिके पाडणारा. आक्रमकता तर अशी की आडवे येणारांचे धोतराचे पितांबरच होतात. जिद्द आणि चिकाटी म्हणाल तर अनेक योजना स्वबळावर वाघाच्या जबड्यातुन खेचून आणाव्या तशाचअक्षरशः खेचून आणल्या. सामाजिक उपक्रम तर विशेष आणि अलौकिक. आंदोलन म्हणाल तर समोरच्याला पळता भुई थोडी होईल. कामाची पद्धत म्हणाल तर विदर्भाची हि वाघीण, रणचंडीकां, सरस्वती, महालक्ष्मी, दुर्गा दुर्गतीनाशीनी. मेणाहुन मऊ तर प्रसंगी वज्राहून कठोर. आ. भावना गवळी म्हणजे अजब रसायन. मी त्यांच्या प्रत्येक कार्यात आवर्जून सहभाग नौंदवतो तो त्यांच्या लोकाभिमुख कार्य प्रकल्प योजनांमुळे आणि त्यांच्या जिव्हाळयाच्या संबंधांमुळे. त्यांनी घेतलेले महाकाय रोजगार मेळावे आणि बचत गटाच्या महिलांना दिलेली उभारी ,स्त्रि सक्षमीकरण योजना अनेकांना दिलासा देणाऱ्या ठरल्या. म्हणूनच न भूतो न भविष्यती असा महिलांचा मेळावा वाशिमला झाला जो पाहून दस्तूरखुद्द मुख्यमंत्री अवाक झाले होते. भावनाताईंचा शेतकऱ्यांसाठीचा कळवळा आणि तळमळ मी जवळून अनुभवली. शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या पिकविमा कंपन्याच्या विरोधातील प्रचंड आणि आक्रमक 'जबाब दो 'आंदोलन. एकाच अर्जाद्वारे शेतकऱ्यांना विविध योजनांचा लाभ, महाबिटी पोर्टल मुदतवाढीसाठी चा प्रयत्न . किती किती सांगू !

मतदारसंघात दळणवळणात गती यावी म्हणून शकुंतला रेल्वे, उड्डाण पूल, पुसद यवतमाळ रेल्वेमार्ग, इतर रेल्वे मार्गासाठी रेल्वे मंत्रालयात दिलेली धडक आणि रेल्वे मंत्र्यांशी अभ्यासपूर्ण चर्चा ,रस्ते विकास महामंडळ आणि तत्सम सर्व विभागाशी संपर्क पाहिल्यावर त्यांच्यात नेतृत्व आणि कार्यकर्तृत्व ठासून भरलेले दिसतात. दूरदृष्टी वर शिक्कामोर्तब तर तेंव्हाच झाले जेंव्हा ताईंनी अपारंपरिक सौर ऊर्जा प्रकल्पासाठी मन्त्र्याशी संवाद साधला. त्यासाठी प्रयत्न केलेत. मतदारसंघात विकास गंगा वाहावी म्हणून प्रचंड निधी त्यांनी खेचून आणला. ना. नितीनजी गडकरींशी अभ्यासपूर्ण चर्चा आणि साहेबांनी दिलेला भरघोस निधीचा मी साक्षीदार आहे. कोविड काळात तर हि मायमाउली सांद्रकरुण भावाने पालकत्व सिद्ध करती झाली. ऑक्सिजन सुविधा, रक्तदान शिबिरे, मोफत भोजन व्यवस्था, सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये विशेष सुविधा यासाठी तर त्यांनी जीव ओतला बहीण बनुन . सुरक्षाबंधनासाठी!

सतत पंचवीस वर्ष जनमानसावर आणि मनामनावर आरूड टिकवून ठेवणाऱ्या आ. भावनाताई सर्वांसाठी आश्चर्य ,कुतूहल आणि कौतुकाचा विषय आहेत . त्यांचा सातत्यपूर्ण आणि सर्वंकष सहभाग. पंचवीस वर्षापासून अख्ख्या मतदारसंघ संघात रक्षाबंधनाच्या निमित्ताने राखी तर अनोखी आणि अद्भुत भावबंधन आहे.

अरे भावना, कैसी हो? क्या चाहिये ? हे

पंतप्रधान नरेंद्र मोदीजींचे आश्वासक शब्द ,पंतप्रधानांना राखीच्या बंधनात बांधणे व्यक्तिगत सौहार्द उजागर करतात. विकास कामांसाठी पाहिजे ते देण्याचे शब्द देणारे नितीनजीं गडकरी भावनाताईंच्या निरातिशय सक्रीयतेचे दर्शन घडवतात. मुख्यमंत्री एकनाथजी समोर टाकलेला एकही शब्द खाली न जाणे हे त्यांच्या कार्यकूशलतेचे आणि विश्वासार्हतेचे प्रतिकच आहे.

छत्रपती शिवरायांचा भव्य अश्वारूढ पुतळा वाशिमला बसवितांना त्यांनी बांधलेली सर्वपक्षिय मोट आ. भावनाताईंच्या संघटन कौशल्याचा नमुना आहे.

त्यांना उमेदवारी नाकारल्याने सर्वपक्षिय हळहळ मतदारसंघाने अनुभवली. कार्यकर्ते चिडले, विपरीत पाऊल घेण्याचा आग्रह करू लागले पण पस्तीस वर्षाची तपश्चर्या असलेल्या भावनाताईंनी सर्वांना एकच मार्ग दाखवला तो मार्ग म्हणजे शिवसेना, शिवसेना, शिवसेना !

अशी लोकाभिमुख, करुणाकल्लोळ, रणरागिणी, धीरोदात्त, माऊलीहुनी मयाळ, वङ्काम् वङ्कोन आमदार भावनाताई गवळी यांना वाढदिवसाच्या खुप शुभेच्छा !

ताई आपणांस दीर्घायुष्य, निरामय आयुष्य आणि ऐश्वर्यसंपन्न आयुष्य प्राप्त होवो हिच भगवंताच्या चरणी प्रार्थना!

प्रा. दिलीप जोशी, वाशीम.
९८२२२६२७३५

सिटी न्यूज सुपरफास्ट बुलडाणा
शनिवार, दि. २३ मे २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

## आदर्श नगरातील श्री संत गजानन महाराज मंदिरात अधिक मासानिमित्त ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन

**मलकापुर:** आदर्श नगरातील श्री संत गजानन महाराज मंदिर येथे महापर्वकाळ अधिक मासानिमित्त आदर्श नगर महिला मंडळाच्या वतीने ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन रविवार दि.२४ मे २६ ते दि.३० मे २६ पर्यंत आयोजन केले आहे. ह.भ.प पंढरीनाथ महाराज (कोन्हाळा बाजार)व्यासपीठ चालक असून सकाळी ५ ते ६ पर्यंत काकडा आरती, सकाळी ८ ते १२ पर्यंत ज्ञानेश्वरी पारायण, सायंकाळी ६ ते ७ हरीपाठ असा कार्यक्रम आयोजित केला असून ठवाचावी ज्ञानेश्वरी!डोळा पहावी पंढरी!!भाव धरोनिया वाचे ज्ञानेश्वरी कृपाकरी हरि त्यावरी!! या ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचा अवश्य लाभ घेण्याचे आवाहन आदर्श नगर महिला मंडळाच्या वतीने करण्यात आले ले आहे.

# कचऱ्याच्या प्रश्नावरून खामगाव पालिका अलर्ट

## ◆ नगराध्यक्षांकडून संकलन केंद्राची पाहणी ◆ स्वच्छता व्यवस्थेची घेतली झाडाझडती

प्रतिनिधी २३ मे

**खामगाव:** शहरातील वाढत्या कचरा समस्येच्या पार्श्वभूमीवर नगराध्यक्षा अपर्णा फुंडकर यांनी गुरुवारी शहरातील कचरा संकलन केंद्राला भेट देऊन स्वच्छता व्यवस्थापनाची सविस्तर पाहणी केली, यावेळी कचरा संकलन प्रक्रिया, विलगीकरण, कंपोस्ट खतनिर्मिती, तसेच घंटागाडी व्यवस्थापनाचा आढावा घेत संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना आवश्यक सूचना देण्यात आल्या.

गेल्या काही दिवसांपासून शहरातील कचरा संकलनाचा प्रश्न ऐरणीवर आला होता. काही भागांत कचरा उचलण्यात विलंब होत असल्याने नागरिकांकडून नाराजी व्यक्त केली जात होती. या पार्श्वभूमीवर नगराध्यक्षा फुंडकर यांनी



प्रत्यक्ष कचरा संकलन केंद्रात जाऊन तेथील परिस्थितीची पाहणी केली. यावेळी त्यांनी कचरा संकलनासाठी वापरण्यात येणाऱ्या मशिनरीची तपासणी केली; तसेच संबंधित विभागातील अधिकारी व



कर्मचाऱ्यांची जबाबदारी, कामकाजाची पद्धत आणि उपस्थिती नोंदींचाही आढावा घेतला. शहर स्वच्छतेत कोणताही निष्काळजीपणा सहन केला जाणार नाही, असा स्पष्ट संदेश यावेळी देण्यात आल्याचे सांगण्यात आले. दरम्यान, खामगाव नगरपरिषदेत शहर स्वच्छतेसंदर्भात वॉर्ड प्युन कर्मचाऱ्यांची महत्त्वपूर्ण बैठकही पार पडली. बैठकीत शहर अधिक स्वच्छ, सुंदर आणि आरोग्यदायी ठेवण्यासाठी स्वच्छता कामे नियोजनबद्ध पद्धतीने राबविण्याबाबत चर्चा करण्यात आली.याप्रसंगी मुख्याधिकारी डॉ. प्रशांत शेळके, उपाध्यक्ष शेखर पुरोहित, गटनेते विजय उगले, आरोग्य सभापती प्रवीण कदम, बांधकाम सभापती सतीशआप्पा दुडे, मंगेश इंगळे, नगर अभियंता लबडे, उपअभियंता म्हस्के, सहायक अभियंता नारखेडे यांच्यासह विभागप्रमुख, कर्मचारी आणि संबंधित ठेकेदार उपस्थित होते.

**कर्मचाऱ्यांच्या अडचणींचीही दखल !**
स्वच्छता कर्मचाऱ्यांनी मांडलेल्या विविध अडचणी व समस्या यांची गंभीर दखल घेत संबंधित अधिकाऱ्यांना त्या तातडीने मार्गी लावण्याच्या सूचना देण्यात आल्या. तसेच सर्व विभागांनी समन्वयाने काम करण्याचे आवाहनही करण्यात आले.

# पिग्मी एजंटांच्या पोटावर पाय; अडीच टक्क्यांपर्यंतच कमिशन!

## ◆ सहकार विभागाचा निर्णय; ठेवींवर देता येणार नाही १० टक्क्यांपेक्षा अधिक व्याज, एजंट अडचणीत

प्रतिनिधी २३ मे

**खामगाव:** दारोदार फिरून बचतीचे पैसे गोळा करणाऱ्या पिग्मी एजंटांच्या उत्पन्नावर सहकार विभागाने मोठी कात्री चालवली आहे. पतसंस्थांमधील पिग्मी एजंटना दिल्या जाणाऱ्या कमिशनवर आता थेट अडीच टक्क्यांची मर्यादा घालण्यात आली असून, ठेवींवरील व्याजदरही १० टक्क्यांपर्यंतच मर्यादित करण्यात आला आहे. या दुहेरी निर्बंधामुळे राज्यातील सहकार क्षेत्रात क्षेत्रात खळबळ उडाली असून, हजारो पिग्मी एजंटांच्या रोजगारावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. दुसरीकडे जादा व्याजाच्या आशेवर पतसंस्थांकडे वळणाऱ्या ठेवीदारांचाही ओघ घटण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

**घरोघर फिरून ठेवी गोळा करणे कसे परवडणार?**
आजच्या महागाईच्या काळात पेट्रोलचे दर गगनाला भिडले आहेत. अशा स्थितीत केवळ अडीच टक्के कमिशन मिळणार असेल, तर फिरण्याचा खर्चही निघणार नाही. हे काम कसे परवडणार, असा सवाल पिग्मी एजंटांमधून विचारला जात आहे. या निर्णयापूर्वी राज्यातील बहुतांश नामांकित आणि व्यावसायिक पतसंस्था आपल्या पिग्मी एजंटना त्यांच्या एकूण संकलनावर ३ ते ४ टक्के, तर काही ठिकाणी त्याहूनही अधिक कमिशन देत असत.

**जिल्ह्यातही पतसंस्थांत अनेक पिग्मी एजंट !**
जिल्ह्यात नागरी आणि ग्रामीण भागातही पतसंस्थांचे जाळे पसरलेले आहे. या पतसंस्थांच्या माध्यमातून अनेक सुशिक्षित बेरोजगार तरुण पिग्मी एजंट म्हणून काम करत आहेत.

# प्रलंबित मागण्यांसाठी विदर्भ पटवारी संघाचे एकदिवसीय धरणे आंदोलन

## ◆ आर्थिक व प्रशासकीय प्रश्नांवर आक्रमक

प्रतिनिधी २३ मे

**जळगाव जामोद:** ग्राम महसूल अधिकाऱ्यांच्या विविध प्रलंबित आर्थिक, सेवा व प्रशासकीय मागण्यांसाठी विदर्भपटवारी संघाच्या जळगाव जामोद तालुका शाखेच्या वतीने तहसील कार्यालयासमोर २२ मे रोजी एकदिवसीय धरणे आंदोलन करण्यात आले. यावेळी तहसीलदारांना विविध मागण्यांचे सविस्तर निवेदनही देण्यात आले.

वारंवार पाठपुरावा करूनही मागण्यांवर कोणतीही ठोस कार्यवाही होत नसल्याने ग्राम महसूल अधिकारी संघटनेमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाल्याचे पदाधिकाऱ्यांनी सांगितले. संघटनेने दिलेल्या निवेदनानुसार, छत्रपती शिवाजी महाराज महसूल अभियानांतर्गत आयोजित शिबिरांसाठी ग्राम महसूल अधिकाऱ्यांनी स्वतःच्या खर्चातून मंडप, पाणी, फर्निचर, वीज व्यवस्था आदी सुविधा उपलब्ध करून दिल्या होत्या. मात्र, संबंधित खर्चाचे अनुदान अद्याप वितरित करण्यात आलेले नाही. जिल्हाधिकारी कार्यालयाकडून निधी मंजूर झाल्याचे सांगितले जात असले तरी प्रत्यक्षात संबंधित अधिकाऱ्यांच्या खात्यात रक्कम जमा न झाल्याने नाराजी व्यक्त करण्यात आली. तसेच गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतूक प्रकरणांमध्ये महसूल कर्मचाऱ्यांना जीवितास धोका निर्माण होत असल्याचा मुद्दाही संघटनेने उपस्थित केला. अवैध खनिज माफियांविरुद्ध कारवाई करताना नियंत्रण पथकांना पोलिस संरक्षण देण्यात यावे, अशी मागणी यावेळी करण्यात आली. ॲग्रीस्टॅक योजनेच्या प्रचार व प्रसिद्धीसाठी तालुक्यात विविध शिबिरे आणि उपक्रम राबविण्यात आले होते. त्यासाठीचा खर्च ग्राम महसूल अधिकाऱ्यांनी स्वतः केला असून संबंधित निधी अद्याप मिळालेला नसल्याची तक्रार संघटनेने केली. हा खर्च तत्काळ अदा करण्यात यावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. प्रशासनाकडे वारंवार लेखी व तोंडी पाठपुरावा करूनही कोणतीही सकारात्मक कार्यवाही होत नसल्याचा आरोप करत, मागण्या तातडीने मान्य न झाल्यास पुढील काळात तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा विदर्भ पटवारी संघाने दिला आहे.

# मेहकर वनपरिक्षेत्रात वन विभागाची कारवाई

## ◆ लोणार-सुलतानपूर परिसरात छापे; १०० घनमीटर अवैध लाकूड जप्त

प्रतिनिधी २३ मे

**मेहकर:** अवैध वृक्षतोड आणि लाकूड तस्करीविरोधात वन विभागाने मेहकर वनपरिक्षेत्रात मोठी कारवाई करत, सुमारे १०० घनमीटर अवैध लाकूडसाठा जप्त केला. मेहकर, लोणार आणि सुलतानपूर परिसरात मंगळवारी राबविण्यात आलेल्या या धडक मोहिमेमुळे लाकूड तस्करांमध्ये खळबळ उडाली आहे.

वन विभागाला परिसरात विनापरवाना वृक्षतोड करून मोठ्या प्रमाणावर लाकडाची बेकायदेशीर साठवणूक होत असल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. त्यानुसार वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आदेशान्वये विशेष पथकाने विविध ठिकाणी छापेमारी केली. या कारवाईत विनापरवाना साठवून ठेवलेले लाकूड जप्त करण्यात आले असून, संबंधितांविरोधात वन कायद्यानुसार कारवाईची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.ही मोहीम वन विभागाचे वरिष्ठ अधिकारी जमीर शेख यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच सहायक वनसंरक्षक व्ही. एम. काकडे यांच्या नियोजनानुसार राबविण्यात आली.

वनपरिक्षेत्र अधिकारी आर. आर सातपुते यांच्या नेतृत्वाखालील पथकाने लोणार आणि सुलतानपूर परिसरात छापे टाकत ही कारवाई केली. वनपरिक्षेत्र अधिकारी सातपुते यांनी सांगितले की, अवैध वृक्षतोड आणि लाकूड तस्करी रोखण्यासाठी विभागाकडून सातत्याने विशेष मोहिमा राबविण्यात येत आहेत. जप्त लाकडाच्या साखळीचा आणि संबंधित रॅकेटचा तपास सुरू असून दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

**अवैध वृक्षतोडीचा प्रश्न ऐरणीवर!**
या कारवाईत वनपाल व्ही. एम. फुके, वनरक्षक कैलास चौधरी आणि इतर कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला. दरम्यान, वाढत्या अवैध वृक्षतोडीमुळे पर्यावरणीय संतुलनाचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असून वन विभागाने ग्रामीण भागात देखरेख अधिक कडक करण्याचे संकेत दिले आहेत.

# सोलर यंत्रणेवर चोरट्यांचा डल्ला; केबलसह साहित्य लंपास

## रामनगर शिवारातील घटना : आरोपीवर गुन्हा दाखल

प्रतिनिधी २३ मे

**खामगाव:** तालुक्यातील रामनगर शिवारात अज्ञात चोरट्यांनी शेतातील सोलर पंप यंत्रणेतील साहित्य चोरी करत प्लेट्सचेही मोठे नुकसान केल्याची घटना उघडकीस आली आहे. या घटनेत सुमारे ४० हजार ३०० रुपयांचे साहित्य चोरून नेण्यात आले असून, सोलर पॅनलचेही नुकसान करण्यात आले आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, रामनगर येथील शेतकरी श्रीकृष्ण विद्याधर कोरडे यांच्या शेतात २० मे रोजी सायंकाळपासून ते २१ मे रोजी

सकाळदरम्यान ही चोरी झाली. अज्ञात चोरट्यांनी शेतातील सोलर पंप यंत्रणेला लक्ष्य करत, १५० फूट सर्व्हिस केबल, सोलर पिन तसेच मोटर पंपाची २४० फूट लांबीची केबल चोरून नेली. चोरीदरम्यान सोलर पॅनल प्लेट्सचेही नुकसान करण्यात आल्याने शेतकऱ्याचे दुहेरी नुकसान झाले आहे.

सतत वाढत असलेल्या अशा चोरीच्या घटनांमुळे परिसरातील शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

याप्रकरणी खामगाव शहर पोलिस ठाण्यात अज्ञात आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०३ (२) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलिस अंमलदार बाळकृष्ण फुंडकर करीत आहेत.

# भर उन्हात महिलांनी व्यक्त केला संताप केवायसीअभावी ‘लाडक्या बहिणीं’चा लाभ बंद

प्रतिनिधी २३ मे

खामगाव: मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत मिळणारा मासिक लाभ अचानक बंद झाल्यामुळे खामगाव तालुक्यातील आणि शहरातील लाभार्थी महिलांमध्ये कमालीचा संताप आणि संभ्रम पाहायला मिळत आहे. योजनेचा हप्ता खात्यात जमा न झाल्याने त्रस्त झालेल्या शेकडो महिलांनी येथील महिला व बालकल्याण विभागात धाव घेत चौकशीसाठी मोठी गर्दी केली. अनेक महिलांचा लाभ बंद होण्यामागे बँकेची ग्राहक ओळख प्रक्रिया (केवायसी) अपूर्ण असणे, केवायसीमध्ये तांत्रिक चुका असणे किंवा बँक खात्याशी संबंधित इतर त्रुटी असणे ही मुख्य कारणे समोर येत आहेत. या संदर्भात महिला बालकल्याण

विभागातील कर्मचाऱ्यांना विचारणा केली असता, केवायसी बंद किंवा तांत्रिक अडचणी आहेत, अशी उत्तरे दिली जात आहेत. अनेक प्रश्नांची ठोस उत्तरे अधिकाऱ्यांकडेही उपलब्ध नसल्याने शासकीय कर्मचारी आणि लाभार्थी महिला अशा दोन्ही बाजूंनी मनस्ताप सहन करावा लागत आहे. महायुती सरकारने सुरू केलेल्या या योजनेसाठी सुरुवातीला ३१ डिसेंबरपर्यंत राष्ट्रीयकृत बँकांमध्ये केवायसी पूर्ण करण्याची अट घालण्यात आली होती. त्यानंतर प्रशासनाने ही मुदत ३१ मार्चपर्यंत वाढवली होती. मात्र, शेवटच्या टप्प्यात वारंवार सर्व्हर डाऊन होणे, तांत्रिक बिघाड आणि इतर प्रशासकीय अडचणींमुळे हजारो महिलांची केवायसी दुरुस्ती रखडली. परिणामी, नियत वेळेत व प्रक्रिया पूर्ण न होऊ शकल्याने या महिलांचा हप्ता रोखण्यात आला.

## ◆ महिला बालकल्याण विभागात महिलांची गर्दी

**महिलांच्या खात्याबाबत तांत्रिक अडचणी**
चालू आठवड्यात योजनेचे अनेक नियमित हप्ते (मार्च, एप्रिल आणि मे महिन्याचे) पात्र लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा झाले आहेत. मात्र, ज्या महिलांच्या खात्यात तांत्रिक अडचणी आहेत, त्यांना या रकमेपासून वंचित राहावे लागले. हक्काचा लाभ मिळवण्यासाठी आता भर उन्हात महिलांना शासकीय कार्यालयाबाहेर लांबच लांब रांगा लावून ताटकळत उभे रहावे लागत आहे. या तांत्रिक गोंधळातून शासनाने त्वरित मार्ग काढावा आणि रखडलेला लाभ पुन्हा सुरू करावा, अशी मागणी आता महिला वर्गातून होत आहे.

# वाळूची अवैध वाहतूक; पाच टिप्पर जप्त!

## ◆ ‘एलसीबी’ कडून ७६ लाखांचा मुद्देमाल हस्तगत

प्रतिनिधी २३ मे

**नांदुरा:** बुलढाणा स्थानिक गुन्हे शाखेने (एलसीबी) सावरगाव नेहू शिवारात गुरुवारी (दि. २१) रात्री मोठी कारवाई करत, वाळुची अवैध वाहतूक करणारे पाच टिप्पर जप्त केले. या कारवाईत सुमारे ७६ लाख रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असून, पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस उपनिरीक्षक पंकज सपकाळे व त्यांचे पथक मलकापूर उपविभागात गस्त घालत होते. दरम्यान, काळेगाव येथील पूर्णा नदीपात्रातून शासनाचा महसूल बुडवून वाळूची अवैधरीत्या वाहतूक सावरगाव नेहूमार्गे मलकापूरकडे होत असल्याची माहिती मिळाली. माहितीच्या आधारे पोलिसांनी सावरगाव नेहू येथील मराठी शाळेजवळ पंचांसमक्ष



नाकाबंदी केली. रात्री साडेसातच्या सुमारास समोरून येणारे चार ते पाच टिप्पर थांबवून चालकांकडे वाळू वाहतुकीचा परवाना मागितला असता त्यांच्याकडे कोणतेही वैध कागदपत्र आढळून आले नाही. या कारवाईत प्रत्येकी सुमारे दोन ब्रास प्रमाणे एकूण दहा ब्रास वाळू जप्त करण्यात आली. तसेच प्रत्येकी अंदाजे १५ लाख रुपये किमतीचे पाच टिप्पर असा एकूण ७६ लाख रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी ताब्यात घेतला.याप्रकरणी योगेश विजय काळे (रा. बेलाड), आकाश सुरेश कंडारकर (रा. झोडगा), शुभम मानिक इंगळे (रा. धरणगाव), लक्ष्मण धोंडू चव्हाण (रा. नेहरू नगर, मोताळा) व प्रल्हाद सुपडा नरवाडे (रा. मेंढळी, मोताळा) यांच्याविरुद्ध नांदुरा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिस उपनिरीक्षक पंकज सपकाळे यांच्या फिर्यादीवरून भारतीय न्याय संहिता २०२३ मधील संबंधित कलमांसह खाण व खनिज (नियमन व विकास) अधिनियम १९५७ अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पुढील तपास पोलिस हवालदार विक्रमसिंग राजपूत करीत आहेत.

# विदर्भ पटवारी संघाचे तहसिलसमोर धरणे

प्रतिनिधी २३ मे

**संग्रामपूर:** गेल्या अनेक दिवसापासून प्रलंबित असलेल्या मागण्यांसाठी ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) यांनी शुक्रवारी संग्रामपूर तहसील कार्यालयासमोर धरणे आंदोलन केले. आर्थिक व सेवा विषयक मागण्या पूर्ण करा अशी मागणी या धरणे आंदोलनातून करण्यात आली.


विदर्भ पटवारी संघ तालुका शाखा संग्रामपूर च्या वतीने शुक्रवारी धरणे आंदोलन करण्यात आले. महाराजस्व अभियान शिबिराच्या खर्चाचा परतावा करण्यात यावा. ॲग्री स्टॅग योजनेच्या खर्चाची रक्कम परत करण्यात यावी. तलाठी कार्यालयाच्या भाड्याची थकबाकी रक्कम देण्यात यावी. या प्रलंबित मागण्यासाठी संघटनेच्या वतीने अनेकदा वरिष्ठांशी चर्चा करण्यात आली पण यावर काहीच तोडगा न निघाल्याने टप्प्याटप्याने आंदोलन करण्यात येत आहे. यानंतर आता २६ मे रोजीडीएस सी जमा करणे ऑनलाईन कामकाजावर बहिष्कार व संपूर्ण असहकार आंदोलन करण्यात येईल. २९ मे रोजी सामूहिक रजा आंदोलन करण्यात येणार आहे. एक राष्ट्रीय कर्तव्य म्हणून जनगणनेची कामे नैसर्गिक आपत्ती निवडणूक ची कामे सुरू ठेवण्यात येतील अशी माहिती आज संघटनेच्या वतीने देण्यात आली.आज पार पडलेल्या धरणे आंदोलनात विदर्भ पटवारी संघाचे जेष्ठ पदाधिकारी विनोद भिसे’ सिद्धेश्वर रंगदळ’ सुदेवाड यांचे सह तालुका अध्यक्ष सुनील कुसळकर उपाध्यक्ष गौरव पाटील सचिव आशिष सेवेकर सुषमा कांबळे यांचे सह तालुक्यातील सर्व तलाठी उपस्थित होते. मागण्या मान्य न झाल्यास आंदोलन आणखी तीव्र करण्याचा इशारा यावेळी विदर्भपटवारी संघ तालुका शाखेच्या वतीने देण्यात आला आहे.

# शेती मशागतीसाठी बैलजोडीवर भारी पडली ट्रॅक्टरची हॉर्सपॉवर !

## शेतकऱ्यांची यांत्रिक शेतीकडे वाटचाल: मजूर मिळत नसल्याने अडचणी वाढल्या!

प्रतिनिधी २३ मे

**खामगाव:** शेतीकामासाठी मजुरांचा प्रचंड तुटवडा निर्माण झाल्याने बहुतांश शेतकरी यांत्रिक शेतीकडे वळत आहेत. सालगड्यांच्या अभावामुळे बैल सांभाळणे कठीण झाल्याने अनेक शेतकऱ्यांनी बैल विकून टाकले असून, त्याऐवजी ट्रॅक्टरच्या माध्यमातून शेतीची सर्व कामे करण्यावर भर दिला जात आहे. परिणामी, ट्रॅक्टर विक्रीचा आकडा सातत्याने वाढत असल्याचे चित्र आहे.



विविध शासकीय योजना, अनुदान, जीएसटीमधील कपात, मजुरांची टंचाई आणि बैलांच्या संख्येत झालेली घट आदी कारणांमुळे २०२५-२६ या आर्थिक वर्षात ट्रॅक्टर विक्रीत काही प्रमाणात वाढ झाली आहे, तसेच ट्रॅक्टरवर मळणी यंत्रही चालवता येत असल्याने मका, तूर, हरभरा आणि ज्वारी काढणीसाठीही अनेक शेतकरी ट्रॅक्टरचा वापर करत आहेत. त्यामुळे ग्रामीण भागात बैलांपेक्षा ट्रॅक्टरचे प्रमाण अधिक दिसून येत आहे.पारंपरिक पद्धतीने कामे करण्याऐवजी यांत्रिकीकरणाने शेती मशागतीची कामे केल्यास वेळेत कामे होतात. त्यातच मजूर मिळत नसल्याने शेतीतील विविध कामे करण्यासाठी ट्रॅक्टरशिवाय पर्याय नाही. शासनही यांत्रिक शेती करण्यासाठी प्रोत्साहन देत आहे. विविध योजनांच्या अंतर्गत अनुदान दिले जात आहे. परिणामी, उन्हाळी मशागतीची २० टक्के कामे आता ट्रॅक्टरने केली जात आहेत.महाडीबीटी कृषी यांत्रिकीकरण योजना, अनुसूचित जाती-जमाती घटक योजना, राष्ट्रीय कृषी विकास योजना, तसेच विविध बँकांच्या सुलभ कर्ज योजनांद्वारे ट्रॅक्टर खरेदीसाठी अनुदान आणि कर्ज उपलब्ध होत आहेत, तसेच काही योजनांमध्ये महिला आणि अल्पभूधारक शेतकऱ्यांना विशेष प्राधान्य दिले जात आहे. शेतीची बहुतांश कामे आता ट्रॅक्टरने केली जात आहेत.शासनाच्या विविध योजनांअंतर्गत ट्रॅक्टर खरेदीसाठी अनुदान दिले जाते. मात्र, सध्याचे अनुदान अपुरे असल्याने अल्पभूधारक शेतकऱ्यांना या योजनांचा अपेक्षित लाभ घेणे कठीण जात आहे. त्यामुळे ट्रॅक्टर खरेदीवरील अनुदानात वाढ करावी, अशी मागणी होत आहे.

# जनभावना

























हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ▪ संपर्क – 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642, RRC Helpline No. 8484842135

CMYK CMYK